# किस्मतपूरचा जमीनदार

## खंडकाव्य

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
ग्रं. नं.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

REFBK-0005496

लेखक

राजकवी–चंद्र शेखर

९८३६

विभाग
क्रमांक
नौ. दि.
शाखा

# किस्मत्पूरचा जमीनदार

खंडकाव्य

अनुक्रम ...
विभाग ...
क्रमांक ...
नों. दि ...
REFBK-0005496
दा. क्र. ५४९६
संग्रह शाखा

राजकवि चंद्रशेखर.

मुद्रक—
ग. गो. दिवाकर,
मॅनेजर, विजय प्रेस,
५७० शनवार पेठ, पुणें.

## आ भा र

—❀—

राजकवि चंद्रशेखरकृत हें खंडकाव्य वाचकांच्या हातीं देण्यास आनंद वाटतो.

आमच्या विनंतीस मान देऊन साहित्यसम्राट् न० चिं० केळकर यांनीं या काव्यास पुरस्कार लिहून दिल्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

'विजय' प्रेसनें अल्पावधींत पुस्तक सुबक रीतीनें छापल्याबद्दल त्याचे व्यवस्थापक रा० दिवाकर यांचा मी आभारी आहे.

वि. पां. नेने.

प्रकाशक—
वि. पां. नेने, बी. ए.
६५ बुधवार पेठ, पुणें २.

# साहित्यसम्राट् श्री. तात्यासाहेब केळकर यांचा पुरस्कार.

रा. रा. नेने यांस,

कृ. सा. न. वि. वि.,

विद्यमान मराठी कवींतील जुन्या पिढीचे अग्रणी राजकवी चंद्रशेखर यांच्या "किस्मत्पूरचा जमीनदार" नामक खंड काव्याचें प्रकाशन करून आपण मराठी काव्यग्रंथ-संग्रहांत एक मौल्यवान भर घातली यांत संशय नाहीं. या काव्यांतील कथानक साधें पण मनोरम असून काव्याची भाषा अनलंकृत पण गोड आहे. मधूनमधून वर्णनें नैसर्गिक व रमणीय अशीं साधलीं आहेत. कवी जुना खरा तथापि नवसुधारणा व नवमत यांची नुसती जाणीवच नव्हे तर किंचित् छापहि त्यांच्या या काव्यावर पडलेली आहे, व कवीला वाटलेल्या या आश्चर्यकारक परिस्थितीच्या चित्रणांतून विनोद मधूनमधून डोकावतो.

मनोविश्लेषणात्मक काव्यें लिहिण्याचा हल्लीं जो प्रघात आहे त्याच्या अगदीं विरुद्ध दिशेला असणारें हें काव्य वाटतें; कारण त्यांत वस्तुसृष्टीच्या निरीक्षणावर व वर्णनावर मुख्य भर दिलेला आहे. कवी चंद्रशेखर यांच्या इतक्या उतार वयांत त्यांचें काव्यविषयक प्रेम व हौस हीं कायम राहिलेलीं पाहून आनंद वाटतो. पुष्कळ नवेनवे कवी होऊन गेले, तथापि त्यांच्या गर्दीतूनहि पलीकडे नजर द्यावी व न्याहाळावेसें वाटावें असाच हा कवी आहे यांत शंका नाहीं. आपण त्यांचें हें खंडकाव्य प्रसिद्ध केलें याबद्दल त्यांचें व आपलेंहि अभिनंदन करतों. कळावें.

आपला

**न. चिं. केळकर.**

# मुखोद्गार

आमचे विद्याविनयसंपन्न व लोकमान्य श्रीमंत सरकार तिसरे सयाजीराव महाराज गायकवाड, यांचे इतिहासांत अतुल असें राज्यारोहण होऊन आज साठ वर्षें पूर्ण झालीं. ह्या अपूर्व प्रसंगाच्या संस्मरणार्थ आज मोठ्या थाटानें त्यांचा हीरकोत्सव ( Diamond Jubilee ) साजरा होत आहे.

ह्या महोत्सवाच्या अंगभूत मी "किस्मत्पूरचा जमीनदार" हें नवीन खंडकाव्य तयार करून तें आमच्या महाराष्ट्रांतील रसिक बांधवांस आज सादर करीत आहें.

हें काव्य लघुकथेच्या स्वरूपाचें आहे. त्याची स्वकपोलकल्पित रूपरेखा, सार्धेच पण मनोरम कथानक, ऐतिहासिक छटा, विविध भूमिका व त्यांचे स्वभाव, प्रसंगोपात्त नानाविध संभाषणें, ग्रामोद्धाराची योजना,–Village Uplift Scheme–, सामाजिक सुधारणा, सहकार्यादि विषयनाविन्य, भाषासौंदर्य, रसपरिपोष, प्रसाद व माधुर्य, इत्यादि प्रमुख बाबतींची सजावट करवेल तितकी सरस रमणीय करण्याचा प्रयत्न केला आहे.

आतां तो कितपत साधला आहे, याचा निर्णय रसिकांनींच करावयाचा. हें काव्य वाचून त्यांना संतोष झाला, व तें त्यांस आवडलें असें मी ऐकिलें, तर मला अमृतलाभाचाच आनंद होईल ! व तो होवो हीच परमेश्वराजवळ माझी अनन्यभावें प्रार्थना आहे.

बडोदें.<br>
ता. १ जानेवारी १९३६

राजकवि चंद्रशेखर.

अनुक्रम
नों. दि.

# अनुक्रमणिका


| कलम | विषय. | पान. |
| --- | --- | --- |
| | **पूर्वार्ध–आर्या** | |
| १ | काव्यनायकाचा वनवास. ... ... ... | ३ |
| २ | मातेची महती. ... ... ... | ४ |
| ३ | काव्यनायकाचें स्वप्न. ... ... ... | ५ |
| ४ | (अ) सत्यसृष्टींतील मेवास. ... ... ... | ६ |
| | (आ) सोमा भील. ... ... ... | ,, |
| ५ | (अ) ऐतिहासिक मेवासचें प्रतिबिंब ... ... | ७ |
| | (आ) काव्यनायकाचें मनोगत. ... ... ... | ८ |
| ६ | दुर्लभ मित्र व त्याचा हितवाद ... ... ... | ९ |
| ७ | नायकपिता जालनसिंग. ... ... ... | १० |
| ८ | वाघाची शिकार. ... ... ... | १२ |
| ९ | भूमिलाभ. ... ... ... | १३ |
| १० | (अ) माळाची पाहणी. ... ... ... | १४ |
| | (आ) भूस्तर झऱ्याचा माग. ... ... ... | १५ |
| ११ | (अ) कृषिकर्माचा मुहूर्त. ... ... ... | ,, |
| | (आ) सोमा नाईक. ... ... ... | १६ |
| १२ | साधनांची सिद्धता. ... ... ... | १७ |
| १३ | खोंड्यांची लावणी. ... ... ... | १८ |
| १४ | हवेची शुद्धि व बांदांचा शृंगार. ... ... ... | १९ |
| १५ | सुधारणाजनक अगस्तींचाच लाभ. ... ... | २० |
| १६ | वसाहतीची रूपरेखा. ... ... ... | २१ |

## उत्तरार्ध–साकी


| | | |
|---|---|---|
| १ | (अ) चव्हाणांच्या घरीं. | २४ |
| | (ब) सहभोजन. | २६ |
| २ | (अ) दिलरुब्याचा जलसा. | २७ |
| | (ब) आराम. | २८ |
| ३ | सज्जनांचें मनोगत. | २९ |
| ४ | सकाळचें चहापान. | ३० |
| ५ | भोजनविधीचा कार्यक्रम. | ३१ |
| ६ | पहिल्या भेटीचा समारोप. | ३२ |
| ७ | ( अ ) ताजी आठवण. | ३३ |
| | ( ब ) शिक्षणाची रूपलेखा. | ३४ |
| | ( क ) यशस्वी परिपूर्णता. | ३५ |
| ८ | विजयानंद. | ३६ |
| ९ | रामधाम. | ,, |
| १० | प्रमिला–स्वयंवर. | ३७ |
| ११ | वनभोजन कीं गडगनेर ! | ३९ |
| १२ | प्रेमसमाधि हेंच लग्न. | ४१ |
| १३ | मित्रचंद्रोदय. | ४३ |
| १४ | वसाहतीच्या प्रगतीचें निवेदन. | ४४ |
| १५ | ( अ ) लग्नसोहळा. | ४५ |
| | ( ब ) विरहाचें विरजण. | ४६ |
| १६ | ( अ ) प्रियेचें सांत्वन. | ,, |
| | ( ब ) नायकाचें प्रयाण. | ४७ |
| १७ | पुढचा कार्यक्रम. | ४८ |
| १८ | नायकाचें गृहागमन. | ४९ |
| १९ | किस्मतपूरचें निरीक्षण. | ५० |
| २० | वधूप्रवेशाचा बेत. | ५१ |
| २१ | कर्तव्याची पूर्वतयारी. | ५२ |
| २२ | वस्तु–संग्रह. | ५३ |

२३ ( अ ) नवयुग्माचा विनोद. ... ... ... ५५
( आ ) जोडप्याचें प्रयाण. ... ... ... ५६
२४ सरदारगृहीं आगमन. ... ... ... ५७
२५ ( अ ) वळवाचा पाऊस. ... ... ... ५८
( ब ) कुंजवनाची तयारी. ... ... ... ५९
( क ) मेहुण्याची रवानगी. ... ... ... ६०
२६ प्रियाराधन. ... ... ... ,,
२७ कार्यपुष्पांचें तोरण. ( अ. आ. इ. ई. उ. ऊ. ) ६१-६४
२८ उत्सवाचें वर्णन. ... ... ... ६४
२९ समारोप. ... ... ... ६६

# किस्मत्पूरचा जमीनदार

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

राजकवि चंद्रशेखर.

अनुक्र... विभाग ... क्रां... नों. दि.

## ( पूर्वार्ध--आर्या )

१ काव्यनायकाचा वनवास

बहु दूर आज आला कुमार सजन गुरांस चाराया;
एकांत माळरानीं मनोव्यथा आपुली निवाराया.
सुविपुल चारा चरती, फिरती, आनंदल्या म्हशी गाई;
परि तो पालक त्यांचा सुरेल पांवा न वाजवी गाई.
सावत्र माय त्याची सूरज, ही वीज आज कडकडली.
करपुनि त्या आंचेनें त्याचीं अंगें जणों ढिलीं पडलीं.
मन पोळलें, तयाची छाया वदनीं दिसेच, ओंगळ ती.
नयनांस सज्जनाच्या हाय ! अहो आज लागली गळती !
केली नसे न्यहारी, आज शिदोरी नही दिली त्यासी;
मेवासचेंच गोचर गांठितसे तो कुमार उपवासी.
न शिला, शैलसुता ती, सिंदूरांकित इथें असे माता;
मळवट भरोनि तिजला कोणी मांदार वाहिला होता.
फुटक्या परळामाजीं धूपाची होय शेष राखोडी;
पडल्या दिसति नरोट्या; कुमार मातेस हात त्या जोडी.
कळवळला, गहिंवरला, " माडी ! सरदारबाज तू मारी ! "
चरणीं लोळण घाली; शब्द निघेना, कुठोनि उच्चारी !
उकळे दुधापरी तो. मायेच्या भोंवऱ्यांत सांपडला;
आईस आठवोनी करुनि गळा मोकळा बहू रडला.
त्याच्या करुणरवानें हेलावे आसमंत तो सारा.
वनदेवीच्या पायीं अभिषेकाच्याच लागल्या धारा.
" सरदारबा ! " अशी तो दे हृदयाचीच हांक आईतें.
तेणें पाषाणाची द्रवली वनदेवता अगाई ! ते.
तारेवांचुनि गेली स्वर्गीं तत्काळ पोंचली तार;
सरदारबा निघाली.* प्राण तिचा तो कुमार सुकुमार !

---

*Cf:—" Devotion wafts the mind above,
" But heaven itself descends in love; "—*Lord Byron.*

अनुक्र. ७५४३
विभाग
क्रमांक
नों. दि.

## ( पूर्वार्ध--आर्या )

## १ काव्यनायकाचा वनवास

बहु दूर आज आला कुमार सज्जन गुरांस चाराया;
एकांत माळरानीं मनोव्यथा आपुली निवाराया.
सुविपुल चारा चरती, फिरती, आनंदल्या म्हशी गाई;
परि तो पालक त्यांचा सुरेल पांवा न वाजवी गाई.
सावत्र माय त्याची सूरज, ही वीज आज कडकडली.
करपुनि त्या आंचेनें त्याचीं अंगें जणों ढिलीं पडलीं.
मन पोळलें, तयाची छाया वदनीं दिसेच, ओंगळ ती.
नयनांस सज्जनाच्या हाय ! अहो आज लागली गळती !
केली नसे न्यहारी, आज शिदोरी नही दिली त्यासी;
मेवासचेंच गोचर गांठितसे तो कुमार उपवासी.
न शिला, शैलसुता ती, सिंदूरांकित इथें असे माता;
मळवट भरोनि तिजला कोणी मांदार वाहिला होता.
फुटक्या परळामाजीं धूपाची होय शेष राखोडी;
पडल्या दिसति नरोट्या; कुमार मातेस हात त्या जोडी.
कळवळला, गहिंवरला, " माडी ! सरदारबाज तू मारी ! "
चरणीं लोळण घाली; शब्द निघेना, कुठोनि उच्चारी !
उकळे दुधापरी तो. मायेच्या भोंवऱ्यांत सांपडला;
आईस आठवोनी करुनि गळा मोकळा बहू रडला.
त्याच्या करुणरवानें हेलावे आसमंत तो सारा.
वनदेवीच्या पायीं अभिषेकाच्याच लागल्या धारा.
" सरदारबा ! " अशी तो दे हृदयाचीच हांक आईतें.
तेणें पाषाणाची द्रवली वनदेवता अगाई ! ते.
तारेवांचुनि गेली स्वर्गीं तत्काळ पोंचली तार;
सरदारबा निघाली.* प्राण तिचा तो कुमार सुकुमार !

*Cf:—" Devotion wafts the mind above,
" But heaven itself descends in love; "—*Lord Byron.*

अनुक्र. ... दिनां. ... क्र. ... नों. दि. ...

## ( पूर्वार्ध--आर्या )

१ **काव्यनायकाचा वनवास**

बहु दूर आज आला कुमार सज्जन गुरांस चाराया;
एकांत माळरानीं मनोव्यथा आपुली निवाराया.
सुविपुल चारा चरती, फिरती, आनंदल्या म्हशी गाई;
परि तो पालक त्यांचा सुरेल पांवा न वाजवी गाई.
सावत्र माय त्याची सूरज, ही वीज आज कडकडली.
करपुनि त्या आंचेनें त्याचीं अंगें जणों ढिलीं पडलीं.
मन पोळलें, तयाची छाया वदनीं दिसेच, ओंगळ ती.
नयनांस सज्जनाच्या हाय ! अहो आज लागली गळती !
केली नसे न्यहारी, आज शिदोरी नही दिली त्यासी;
मेवासचेंच गोचर गांठितसे तो कुमार उपवासी.
न शिला, शैलसुता ती, सिंदूरांकित इथें असे माता;
मळवट भरोनि तिजला कोणी मांदार वाहिला होता.
फुटक्या परळामाजीं धूपाची होय शेष राखोडी;
पडल्या दिसति नरोट्या; कुमार मातेस हात त्या जोडी.
कळवळला, गहिंवरला, " माडी ! सरदारबाज तू मारी ! "
चरणीं लोळण घाली; शब्द निघेना, कुठोनि उच्चारी !
उकळे दुधापरी तो. मायेच्या भोंवऱ्यांत सांपडला;
आईस आठवोनी करुनि गळा मोकळा बहू रडला.
त्याच्या करुणरवानें हेलावे आसमंत तो सारा.
वनदेवीच्या पायीं अभिषेकाच्याच लागल्या धारा.
" सरदारबा ! " अशी तो दे हृदयाचीच हांक आईतें.
तेणें पाषाणाची द्रवली वनदेवता अगाई ! ते.
तारेवांचुनि गेली स्वर्गीं तत्काळ पोंचली तार;
सरदारबा निघाली.* प्राण तिचा तो कुमार सुकुमार !

---

*Cf:—" Devotion wafts the mind above,
" But heaven itself descends in love; "—*Lord Byron*.

वाटे वनदेवींनें न कळत त्या विठ्ठलास मंतरलें.
त्याचें हृदय निवालें; ओसरले शोकपूर,–ते सरले.
आयासें, उपवासें, करुनि असा शोक, तो जणों थिजला.
मग मातेच्या पायीं झोंपेला येउनी सुखें निजला. १४

## २ मातेची महती

मातेसम ह्या लोकीं हितकर दैवत असें दुजें नाहीं.
म्हणुनीच "मातृदेवो भव" करितो वेद वंद्य आज्ञा ही.
हें दैवत परिपाळी, हें लडिवाळें मुलांस आळवितें;
हें प्रेमाश्रू गाळुनि, अपुल्या संततिकडोनि गाळवितें.
हें आगळीक गिळितें, पिळितें कल्याण व्हावया कान;
हें राग-रोष नेणें, मान मुलें वा करोत अवमान.
रंक बनो, राव बनो, हें परिवारावरी धरी समता.
न हि पक्षपात जाणें, हें पसरी चंद्रिकेपरी ममता.
प्रेमाचें मधुर मधू उपजत हें बालकास चाटवितें.
शील हिरण्मय करुनी चरित तयाचें जगांत थाटवितें !
किंबहुना जननी हें दैवत दें पामरास देवकळा;
त्यास अलौलिक बनवुनि जन्म तयाचा सुधारितें सगळा.
कल्पान्त झालियाही जननी चाही भलेंच संततिचें.
यास्तव वंदुनि माता गौरव गातात साधुसंत तिचे.
छाया दाट वडाची, कूपोदक, संतसंग, ही आई.
गाईचें दूधच हें सदैव हितकर सदैव सुखदायी.
हें पथ्य रोगकालीं, अंजन हें सर्व वेदना शमवी.
हें अमृतकाव्य-गायन, हें संजीवन मनें समुल्लसवीं.
कैसेंहि दुःख होवो, आई ही दुःखितास आठवते.
नांव तिचें जगजेत्या शिकंदराचाहि कंठ दाटवितें !
सज्जन तिच्याच चरणीं विठ्ठल होउनि विसांवतां, त्याला
दृष्टान्त हा मजेचा मनीं वसे तो दिसोनियां आला. ११

# ३ काव्यनायकाचें स्वप्न

त्याला हिरणमयीच्या* तीरीं दिसला महाल सुंदरसा;
ज्याला पुष्पफलान्वित कुंजवनानें दिला दिसे वळसा.
घटयंत्रानें धांवति पाटजलें, नाचती फवारेही;
किलबिल मंजुल चाले, डोलविती तरुलतांस वारेही.
शृंगार आजवरिचे सजविति बहु दालनें महालाचीं;
त्यांतूनि पडदपोशी रजपूतांची असे जहालांची.
हंसासम धवल, मऊ, दिसे बिछाना इथेंच पर्यंकीं;
सज्जनसिंग तयासचि पाहे सरदारवा हिच्या अंकीं.
कोमल शिरीषतंतू! अशा करांगुलि मुलावरी फिरवी;
उदयास येत होता त्याचा कुलदेव तो सुवर्ण-रवी.
" झालास काय जागा ! कां मज बोलाविलें तुवां कुंवरा !
तुज काय दुःख झालें ! तूं कां रडलास सांग सांग जरा."
स्वप्नांत जागुनी तो जननी—मुखचंद्रमा पहाताहे.
न कळे त्यास कुठें मी आहें, आश्चर्य काय हें पाहें.
मारुनि मिठी गळयाला हृदयाचि तो तिजपुढें तदा ओती.
तीं आंसवें बघोनी इंद्राचे तेहि लाजले मोती !
" उगा उगा तूं कुंवरा ! आलें, आहें न मी तुझ्या जवळीं ? "
कमळांच्या देठांनीं, नहि बाहूंनीं तयास ती कवळी.
" तव दुःख आज गेलें. सज्जन ! होशिल इथेंच तूं मोठा.
चिंता करूं नको तूं; काळाचा धांवता असे घोटा.
घे ही ' प्रेमलदेवी '. उदय तुझा ही करील जन्मभरी.
देतें ठेव तुला मी, चौहानांची कुलीन ही नवरी."
आली ! कुसुंभरंगी झगझगतो पेहराव जरतारी;
सरदारबापुढें ती विनयानें राहिली उभी स्वारी !

---

* रेवाकांठा—मेवास ह्या प्रदेशांतून वाहणारी " हीरण " नांवाची नदी.

देवांगनेप्रमाणें सुदिव्य सान्निध्य तें तिचें दिसलें.
पाहोनि मायलेंकीहि कौतुकले, मंद मंद ते हंसले.
काढोनि लाज पाहे सज्जनमुख आरसाच निर्मलसा.
प्रेमलदेवी इजला त्यांतुनि दिसला तिचाच रम्य ठसा !
गालीं गुल्कन् हंसली ! घेई सरदारचा तिचा हात,
देई निज कुंवराच्या–प्रेमासह तोच हात–हातांत.
" सज्जन ! माझ्या बेटा ! आनंदानें रहा महाभागा ! "
झालें. स्वप्न पळालें ! कुमार जागेवरींच हो जागा. १६

## ४ (अ) सत्यसृष्टींतील मेवास

पाही सभोंवतीं तो रेवाकांठा प्रदेश मेवास;
त्याचीं परिचित कुरणें दिसली हीरण नदी पुन्हां त्यास.

बाभूळ बोर कोठें, कोठें निवडुंग कंटकें भरले;
स्वप्नांतिल वैभव तें प्रत्यक्षांतूनि लेशही नुरलें !

क्षितिजास लागलेले डोंगर दूरूनि साजरे दिसती.
त्यांतिल तेज निमालें ! आतां धग मात्र राहिली नुसती !

याच धगींतिल फुणगा, कुमार, जो मंद होय कोजळला,
जठराग्नि पेट घेतां येउनि चैतन्य तोच झळझळला.

## (आ) सोमा भील

गेला उठुनि नदीवर तहान भूकहि जलेंच शमवाया.
तंव तेथ दैवयोगें ये कोणी एक भाकरी खाया.

अस्सल रजपूताला प्राणान्तीं याचना नसे ठावी.
पाहुनि यास विनोदें जेवाया तो मजूर बोलावी.
" बोलाविसी म्हणोनी मान तुला द्यावयास मी येतों."
" या या ! खरोखरी घ्या ! " म्हणुनि कुमारास भाकरी दे तो.

देवांगनेप्रमाणें सुदिव्य सान्निध्य तें तिचें दिसलें.
पाहोनि मायलेंकहि कौतुकले, मंद मंद ते हंसले.
काढोनि लाज पाहे सज्जनमुख आरसाच निर्मलसा.
प्रेमलदेवी इजला त्यांतुनि दिसला तिचाच रम्य ठसा !
गालीं गुल्कन् हंसली ! घेई सरदारवा तिचा हात,
देई निज कुंवराच्या–प्रेमासह तोच हात–हातांत.
" सज्जन ! माझ्या बेटा ! आनंदानें रहा महाभागा ! "
झालें. स्वप्न पळालें ! कुमार जागेवरींच हो जागा. १६

## ४ (अ) सत्यसृष्टींतील मेवास

पाही सभोंवतीं तो रेवाकांठा प्रदेश मेवास;
त्याचीं परिचित कुरणें दिसली हीरण नदी पुन्हां त्यास.

बाभूळ बोर कोठें, कोठें निवडुंग कंटकें भरले;
स्वप्नांतिल वैभव तें प्रत्यक्षांतूनि लेशही नुरलें !

क्षितिजास लागलेले डोंगर दूरूनि साजरे दिसती.
त्यांतिल तेज निमालें ! आतां धग मात्र राहिली नुसती !

याच धगींतिल फुणगा, कुमार, जो मंद होय कोजळला,
जठराग्नि पेट घेतां येउनि चैतन्य तोच झळझळला.

## (आ) सोमा भील

गेला उठुनि नदीवर तहान भूकहि जलेंच शमवाया.
तंव तेथ दैवयोगें ये कोणी एक भाकरी खाया.

अस्सल रजपूताला प्राणान्तीं याचना नसे ठावी.
पाहुनि यास विनोदें जेवाया तो मजूर बोलावी.
" बोलाविसी म्हणोनी मान तुला द्यावयास मी येतों."
" या या ! खरोखरी घ्या ! " म्हणुनि कुमारास भाकरी दे तो.

या समयीं ती भाकर परमान्नाहूनि* लागली गोड !
किंवा विदुरा घरच्या कण्यांस ती एक लाभली जोड !
प्याला हिरण्मयीचें जळ शरदांतील गोड निव्वळ तें.
त्यानें पौष्टिक केलें कार्य+ वसंतांतलेंच निव्वळ तें !
झाला कुमार ताजा. संकट-काळांत अन्नदात्याला
त्यानें प्रणाम केला. विचारिलें नांव गांवही त्याला.
सोमा म्हणोनि होता तो जवळींचाच, भिल्ल जातीचा.
चर्येवरोनि त्यानें ओळखिला तो कुमार छातीचा.
त्यानें पितां तमाखू याद, दयाभाव, याचिला याला;
घेउनि निरोप दोघे भिन्नपथें लागलेहि जायाला.
भावी सज्जनसिंहचि, त्याला सिंहावलोकनें पाही.
तो उपकारक त्याच्या सखोल हृदयांत कोरिला राही.
पुनरपि येउनि त्यानें नमिली माता अनन्यभावानें.
घेउनि गुरें निघाला. दूर पुन्हां त्या घरीं असें जाणें. १४

## ५ (अ) ऐतिहासिक मेवासचें प्रतिबिंब

चिंतेंत मंद चाले. तें शरदाचें दिनावसान असें.
मंदोष्ण वात वाहे. विश्व रवी रंगवी सुवर्ण रसें.
मेवास त्या छटेनें भासे होता तसाच सोन्याचा.
संभव हाय ! न उरला तो सोन्याचा फिरोनि होण्याचा.
यांतचि एके कालीं ती वीरश्री विराजती झाली.
सत्याग्रहेंच तीच्या लक्ष्मी वश होउनी तिला आली.
सिंहकिशोरासम ते नांदति सामंत ह्या समंतांत.
गायकवाडच त्यांचे पुरविति ते लाड शौर्य-पंथांत.
ह्या अधिराजांसाठीं ते तळहातीं शिरांस घेवोनी,
मजली मारुनि गेले, लढले जीवास जीव देवोनी.

---

* परमान्नम् पायसम् = दूधपाक. + सुवर्णमालिनी वसंत.

ठाकूर शूर वीरचि, भिल्ल जुटीचे, पहाड छातीचे,
गाण्डीवतुल्य कमठे घुमविति झंकार यांत तांतींचे.
नरसिंह ते दमाजी, ते फत्तेसिंह सिंह हृदयाचे,
ते अग्रणी रणींचे, चतुरच नेते विराजले यांचे.
बहु मोहिमांवरोनी धांवुनि ते वादळापरी गेले.
त्यांनीं शर-धारांनीं चिखल खलांचे कितेकदां केले !
वरसोनि आग त्यांहीं नाहीं जाळोनि टाकिला देश;
उलटा सुकाळ झाला वर्षुनि हे मेघ आणि मेघेश !
प्रतिकूल वात आतां होउनि हे मेघ पांगले गेले.
तरि सूर्यदाह साहुनि छत्र तयांनीं प्रजेवरी केलें !

## ५ (आ) काव्यनायकाचें मनोगत

इतिहास पूर्वजांचे ऐसे ऐके सदैव सज्जन तो;
ते आठवोनि आतां करी विषादामधें निमज्जन तो.
बोले मनासवें तोः—" तो दिन परतोनि आज येइल का ?
पुरुषार्थ पूर्वजांचें भाग्य मला तो उदार देइल का !
तें शौर्य, ते पराक्रम, तें धाडस, ते विवेक, नेक मला
लाभुनि लौकिक माझा होइल का रे जगांत दुमदुमला !
छे ! तो काळ नव्हे हा. यांतुनि ही संपदा कशाला ती !
गंजोनि आज गेली ! होइल रे यापुढें तिची माती !
आतां शास्त्र, कला त्या, बहुविध हुन्नर, उदीम, हेंच हवें.
सोशिकपणा, चिकाटी, भाषा, सौजन्य पाहिजे बरवें !
यांतूनि शक्य तें तें मिळवाया यत्न पाहिजे केला.
यांविण जन्म तुझा बा, जाग मना सज्जना वृथा गेला !"
यापरि कांहींबाही चिंतन करितां घरास तो आला.
जालनसिंग मुलाची चर्या बघतां खजील हो झाला !
सूरजकडोनि आधीं दिलेंच त्यानें मुलास जेवाया.
भोजन करोनि मौनें गेला तो जिवलगास भेटाया.

## ६ दुर्लभ मित्र, व त्याचा हितवाद

दुर्लभसिंग म्हणोनी एक घरंदाज आणि सुविचारी
जिवलग असे तयाचा एका आळींतलाच शेजारी.
'मैत्र' लहानपणींचे; हे रमले खेळलेहि मातींत.
त्यांतूनि जातभाई! सहजाकर्षण असे स्वजातींत.
दुर्लभ पंचविशींतचि सज्जन एकोणवीस वर्षांचा.
त्या रामलक्ष्मणांतुनि भरताचा भाव ये प्रकर्षाचा!
विश्वासपात्र जाणुनि सज्जन हा हृदय त्याजला उघडी;
एकी अभेद्य त्यांची चितोडगडची छबीच ती उघडी!
दुर्लभ यास करावें लागे साहाय्य शेतकामांत.
प्रेषी कामगिरीवरि पिता तयाला कधीं महालांत.
आजचि सायंकाळीं असे महालामधोनि तो आला.
आराम घेत होता. बघुनि कुमारास तो खुषी झाला.
खोलींत बैठकीच्या एकान्तांतूनि मित्र ते बसले.
"कां आज खिन्न कां तूं?" म्हणुनि कुमारास दुर्लभें पुसलें.
त्यानें त्या दिवसाची रोजनिशी वाचिली तयापाशीं.
ऐकुनि सखेद विस्मय झाला त्याच्याहि 'अंतरामा'सी!
"दुर्लभ! माते सन्मुख गोड असें स्वप्न जें मला दिसलें,
होईल का खरें तें! कीं फसवें दैव तें मला हंसलें!"
हा प्रश्न सवंगड्याचा ऐकुनि तो मित्र चिंतुनी म्हणतोः—
"यांतुनि सखोल आहे तव भाग्योदय असेंच मी गणतों.
काय चमत्कार पहा! आजच मी ऐकिलें महालांत;
मातेसन्निधचा हा माळ गड्या, काढिला लिलांवांत.
सरकार वांछिती ही लागवडीनें जमीन सुधराया.
इच्छा असेल तरि चल, जाऊं ये मागणीच बोलाया.
सध्यां कुठुनि तरी मी रकम उभी करुनि ठेवितों गाठीं;
माझ्या नांवें घेतों माळ लिलांवांत हा तुझ्यासाठीं.

नांगर धरूं, मशागत करूं यथाकाळ माळरानाची;
आणूं लागवडीला, पाहूं त्या सत्यता विधानाची.
अनुकूल दैव यत्नें, दैवत यत्नें प्रसन्न होताहे.
यत्नेंच देवगंगा अवतरुनी भूतलावरी वाहे.
किंबहुना ह्या यत्नें स्वर्गहि येउनि वसेल रे येथें!
यत्नेंच भाग्य तव ह्या माळांतुनि काढितां मला येतें.
प्राप्ती मधूनि अर्धा भाग तुझा, श्रमविभाग–मोलाचा;
अर्धा घेउनि त्यानें करीन मी माळ आपला साचा.
अनुकूल काल होतां सज्जन! तूं रकम दे मला माझी.
तूं हो जमीनदारच! नांद सुखानें तिथें रहा राजी.
सध्यां मौन धरोनी ऐकुनि घे सर्व बोल काकींचे.
तुजला देवपणातें देतिल रे हेच घाव टाकींचे!"
दुर्लभ सुमित्र दुर्लभ! त्याचा तो मनसुबा सुदुर्लभसा,
दुर्जन यासहि पटतां रुचेल मग सज्जनांस तो न कसा?
तो आवडोनि त्यानें डोलविली मान त्या विचाराला.
तैसें करावयाचा निश्चय त्या खलव्रतांमधें झाला.
इतक्यांत दुर्लभाची साकरबा माउली तिथें येई;
बेसनलाडू, चिवडा, जलपात्रें सवंगड्यांस त्या देई.
आनंदले. तयांनीं फराळ, जलपान चांगलें केलें.
खाउनि पानविडे ते कामाला आपआपल्या गेले. २३

## ७ नायकपिता जालनसिंग

जालनसिंग–परिस्थिति या समयाला असेच खालवली.
त्यांतुनि त्यानें आतां सूरज ही कर्कशा असे वरिली.
त्याचा जहागिरीचा वांटा दायाद दाबुनि बसले.
वाद–विवादांमध्यें जाउनि पुंजी प्रयत्नही फसले.

अनुक्रम ... विभाग ... क्रमांक ... नों. दि. ... ग्रंथालय

नित्य कुसुंबापाणी, हुक्कापाणी, तसें चहापाणी,
यांनीं उरल्यासुरल्या पैशाचें तेंहि जाहलें पाणी.

शेवट कोरडवाहू दोन बिघे शेत राहिलें बाकी.
त्यांतुनि निर्वाहाला आणुनि तो बाजरी घरीं टाकी.

गाई, म्हशीहि दुभत्या; दूध तयांचें विकोनि टाकावें.
गाडें संसाराचें घेउनि त्यांचें सहाय हांकावें.

यापरि दौलत, सत्ता, गेली; तरि पीळ तो नसे गेला.
अस्सल रजपूतच तो असे पिढीजाद शूर—'वाघेला.'

त्याचें जुन्या पिढीनें शरीर ऐसें कमाविलें शील;
कीं, जें काळाचेही घाव, तडाखे, असह्य सोशील.

तो धिप्पाड, पहाडच ! उंचीनें त्यावरील साग जसा.
मुद्राहि धाडसाची. पाही टंवकारुनीच वाघ जसा.

नांगेच इंगळ्यांचे भासति कल्ले विशाळ वळलेले.
अवशेष दाविती ते पाणिपताच्या धुळींत मळलेले,

होता विशाल कमठा पुरूषभर उंच ह्याच वीराचा.
भाता अखंड भरला बोरूच्या वेगशील तीरांचा.

जे समशेर बहादर सेनेचा खास खेल दाखविती,
विजयी समशेरीला बहुविध कंठामृतेंहि चाखविती;
त्यांच्या समशेरीची मानियलेली बहोण ह्या जवळी;
अजरामरच असे ती; तरी तिला पाजळोनि हा उजळी !

पूर्वज पराक्रमांचे सांगे बडिवार हा असे कांहीं,—
कीं, जणु चंदा भाटच, वाटे कवि गंग हा ! दुजा नाहीं.

ते सांगतां कधीं तो स्फुरण असें ये तयास अनिवार,
कीं तरवारच काढुनि वाऱ्यावरि तो करीतसे वार !

बोले भागूबाई ! यांनीं गोळे छपूनि टाकावे !
असल्यास शौर्य कांहीं समोर समरांगणांत ठाकावें ! १९

## ८ वाघाची शिकार

जणु हें शौर्य पहाया वाघ खरोखरच एकदां आला.
घेवोनि वांसरूं तो गांव शिवेंतुनि पसारही झाला.

होतां सकाळ झाला ह्याविषयीं गवगवाच गांवांत.
'ठाकोर!' म्हणुनि आले कितेक जन ह्याकडे जमावांत.

ते रामराम करुनी सांगति वृत्तांत ऐकुनी हंसला.
"जा! दरबारकडे जा!" बोले—"ठाकोर मी? अहो कसला!"

"दरबार तेहि आपण, आपण ठाकोरही खरे अमुचे."
विनयेंच ते म्हणाले, "आम्हांला रक्षिता दुजा न सुचे.

जबरा वाघ असे हा; आणि तया लागली असे भाळ.
तरि संभाळ करावा. वाघ नव्हे हा उभा असे काळ!"

परदुःखाचा स्पर्शहि होतां नवनीत—शील जे धरिती,
क्षत्रियवीर अहो ते, घातापासुनि बचाव जे करिती.

तत्काळ वीर उठला, घेउनियां तीर आणि तो कमठा.
चाऊल घेत चाले, संगें ठेवोनि एक वारवठा.*

कोळी, भील, वनींचे सांगति कुरणांत वाघ ह्या गेला.
जालनसिंगें अपुला कमठा तत्काळ सज्ज तो केला.

वणवा लावुनि भंवता केला गोंगाट एक हांकाटा;
तंव डरकाळ्या फोडित आला विक्राळ वाघ तो मोठा!

जालनसिंगावरती चवताळुनि झेंप टाकितो वाटे;
जबड्यांत तीर गेला; दुजा शिरोनी उरांत तो फाटे.

तंव कोसळोनि पडला, प्राणान्ताचीच घोर डरकाळी!
शेंपूट हातपायहि खोडुनि पावे विराम त्या काळीं.

---

* जंगलांतील वाटाड्या.

मग गाड्यावर घालुनि तो दरबारांकडेच पाठवला.
सारे खजील झाले ! त्यांना तो शूर, वीर आठवला.
बहुमान, मेजवान्या देती दरबार त्या कुटुंबासी.
जालनसिंगाला मग वचकुनि राहे दरेक मेवासी. १३

## ९ भूमिलाभ

दुर्लभ हा एकुलता पुत्र, जिव्हाळाच मानसिंगाचा;
जणुं काय दशरथाचा रामच, आनंद अंतरंगाचा !
त्याची ती पितृभक्ती, ती सुमती, वागणूक सुविचारी,
शालीनता, हुशारी, पाहुनि तो त्यास आवडे भारी.
हौस, उमेद मुलाची वेळीं धन वेंचुनीहि तो पुरवी.
कमलासमान त्याला प्रसन्न ठेवीच मानसिंग-रवी.
म्हणुनीच दुर्लभानें त्याला माळाचिया लिलांवाची.
वार्ता सांगुनि कथिली स्वयोजना खास मित्रभावाची.
" हा माळ फार मोठा; रकमहि लागेल त्याच मानानें.
" दुर्लभ ! धनको मजला दाखविला आज ह्याच रानानें.
" तव वचन सत्य व्हाया जीवहि ठेवीन मी गहाण मुला !
" मित्रास उद्धराया जा. यशवंताचि करील देव तुला ! "
नेमियलेल्या दिवशीं समितीसन्मुख लिलांव तो झाला.
चुरशींत दुर्लभासाचि पांच हजारांस माळ तो आला.
अर्धी रकम पित्यानें, अर्धी धनकोकडोनि देवविली.
सारी जमीन त्यानें निज नांवें नोंदणींत ठेवविली.
सज्जन दुर्लभसंगें ह्या कामीं जातसे महालांत.
त्याला बनाव झाला हा सुग्रासासमान हाऽांत.
त्यांनीं कुंपण घालुनि रक्षणसीमा सुरेख आंखविली.
स्वप्नामधील सत्ता जगास डोळ्यासमोर दाखविली.

लावुनि मजूर केला शेतासम माळ तो सपाटीचा.
होता पाट चिनी तो हिरण्मयीच्या सुपीक कांठींचा.
मातेसमीप होतें वायव्येला लहान टेकाड,
दुर्लभ म्हणे कुमारा, मज न रुचे, तूं खणोनि हें काढ.
सज्जन टिकाव घेउनि हळू हळू लागलाच कामाला.
कांहीं भाग निघाला, इतक्यामध्यें तटस्थ तो झाला.
बोलावुनि मित्रातें, ते दोघे आपसांत कुजबुजले.
जेवण करुनि दुपारीं घ्याया आराम ते तियें निजले.
दुर्लभ तेथें असतां, सज्जन हा दुर्लभा घरीं गेला.
गाडें घेउनि आला, वंदिति दोघेहि मित्र मातेला.
जटपूनि काम सारें, रात्रीं गाडींतुनीच ते आले.
एकान्तांतुनि त्यांचें सखोल खलबत बरेंचसें झालें.
नंतर जेवुनि दोघे सज्जन गेला घरास माघारीं.
" कां रे उशीर इतका ? " म्हणुनि पिता तो तयास उपकारी.
" माळांत दुर्लभाच्या बापू ! आम्ही अलीकडे खपतों.
" मी जेवूनिहि आलों." इतकें बोलोनि राहिला गप तो. १८

## १० ( अ ) माळाची पाहणी

श्रीमान् देव दिवाकर असतां उदयाचलांत खोल असा,
अपुली कांचनकांती हीच उषा पाठवी पुढें सहसा.
भपकेदार कुसुंबी नेसुनि ये मंदिलीच शालू ती.
चैतन्यदेव—दूती, फिरवी जगतामधोनि जादू ती.
दचकोनि विस्मयानें प्रसार पावोनि पाहती नयनें.
उत्तेजनें मिळोनी उठती मग लोक टाकुनी शयनें.
सृष्टींतुनि ह्या समयीं मिरवे आनंद पूर्ण उल्हास.
करितात नागरिक जन मांगल्याचेहि सात-सायास.
ग्रामीण तरुण अमुचे, वाकब त्यांना न आजच्या वाता !
ते चांदले करोनी गेले ! नमिती उदार ती माता.

त्यांचीं मुखारविंदें उदयानें फुलुनि हांसरीं दिसलीं.
दुर्लभ म्हणे कुमारा, आतां चिंता न राहिली कसली.
हातांत हात घालुनि करिती ते पाहणीच माळाची.
" येथें विहीर व्हावी ! ना तरि होईल रे उन्हाळाची ! "

## १० (आ) भूस्तर झऱ्याचा माग

दुर्लभ हें वदतांना दोघे पूर्वेस चालले होते;
तंव एक बोर दिसली. पुढेंच वारूळ गवसलें हो ! तें.
येथोनि माळसीमा, हिरण्मयीही नसेच दूरवर;
दुर्लभ चमकुनि बोले, " पोळी पिकलीच जाण जन्मभर ! "
त्यांनीं तिथें हत्यारें छपवुनि गवतांत ठेविलीं होतीं.
बोरीच्याच मुळाशीं खोदुनि हातेक काढिली माती.
' उपवनरहस्य× ' पटलें ! होते बेडूक तें जथाबंद !
उडती भिउनि पटापट ! गगनीं मावे न हो तदानंद !
बदरी–पश्चिमभागीं दुर्लभसिंगेंच ठोकिली मेख.
सानंद सज्जनाला म्हणे चमत्कार यापुढें देख !
येथें सुमुहूर्तानें करीन आरंभ कूप खणण्याला.
माळामधोनि नांगर संतत लावीन दोन फिरण्याला.
ऐसा विचार करुनी ते दोघेही घराकडे वळती.
ध्येयाते, विजयाते, गांठाया ते अतीव तळमळती. १४

## ११ (अ) कृषिकर्माचा मुहूर्त

दिन माघ शुद्ध दशमी, ठरलेला सोमवार तो आला.
वृषभेंतिल चंद्राचा सुयोग त्या रोहिणीसवें झाला.
दुर्लभसिंग कुमारहि मिळुनि निघाले पहा ! पहांटे ते.
चालुनि आज झपाझप माळाच्या काटितात वाटेतें.

---

× ह्या नांवाचा ग्रंथ आहे.

नांगर बैलहि घरचे, तुंदिल खाउनि पिऊनि झालेले,
ते हल ओढित नेती; दिसती जोरांत फार आलेले.
मातेसन्निध येतां फोडिति ते श्रीफलें तडाख्यांनीं.
भावें वंदुनि तिजला, करिती नांगर सुरू धडाक्यानीं.
हलधर बलरामच तो, दुर्लभ दिसला हुशार या कामीं;
प्रहरावधी तयानें वराचसा माळ झेंपिला नामी !
यद्यपि कुमार सज्जन त्याच्या इतका नसेच कसलेला,
तरि नांगरोनि त्यानें मोठा तुकडा दिसे पुरा केला.
इतुक्यामधें मुकादम घेउनि आले मजूर कामातें;
कोठें विहीर करणें ! म्हणती दावा ठिकाण आम्हां तें.
आंखोनि घेर मोठा बोरीच्या पश्चिमेस ती जागा
दावुनि, मुहूर्त करुनी, दुर्लभ वदला इथें खणूं लागा.
यापरि अभ्युदयाचीं आरंभुनि आज दोन काजें तीं,
जेवायास दुपारीं हिरण्मयीवरिच मित्र ते येती.

## ११ (आ) सोमा नाईक

तंव तैं ऋणानुबंधें त्या दिवशींचाच भील तो दिसला.
" सोमा ! ओळख पटली," सज्जन ऐसें वदोनियां हंसला.
यांनीं उलट तयाला आज दिला गोड घांस जेवाया.
सोमा प्रसन्न झाला. विनवितसे काम काज सांगाया.
त्याची सर्व हलाकी ऐकुनि हे वदति, " ये ! इथें राहीं.
" संभाळ माळ अमुचा. नेकीनें तुज उणें न हो कांहीं.
" हीरणनजीक देऊं बांधुनि तुज झोंपडीहि माळांत.
" सालाची फसल भरूं, शिवाय वेतन करूं सुकाळांत."
" दूरावरुनि नदीचें पाणी नेणें न होय सोईचें."
" सोमा म्हणे,—" करावें लागे मज कामही रसोईचें.
" आपण विहीर करितां आहे तेथें जिवंतसें पाणी.
" जमिनींतल्या झऱ्यांचीं चिन्हें आहेत माझिया ध्यानीं.

" पाणी आल्यावरतीं माल—धनाची न वाट पाहीन.
" मी आप—मालकांचा होवोनी दास येथ राहीन.
" येइन तसा मधोनी कामाचा शोध घ्यावया येथें.
" अपुले स्वभाव पाहुनि अंतर माझें भरोनि हो येतें !
" मी नाइक असतांना चोराची माय काय हो व्याली !
" माझी राखण समजा निवळ तिजोरीच आपली झाली ! "
खातामाताकरितां खाउनिपिउनी हुशार ते झाले.
माळामधुनि तिघेही स्थळ विहिरीचें पहावया आले.
हें काम दुर्लभानें दिधलें चौकसपणें इजाऱ्यानें.
तें चाललें झपाझप मुकादमाच्या खऱ्या दराऱ्यानें.
माळांत कापलेली वैरण खाउनि रवंथ जे करिती,
पाणी पाजायाला कुमार ने बैल ते नदीवरती.
नंतर घरीं निघाले घेउनियां बैल आणि नांगर ते.
पहिल्याच मोरच्यानें केलें यशवंत अर्ध संगर तें ! २२

## १२ साधनांची सिद्धता

शकुनारंभानंतर दोन गडी योजिले तया कामीं.
ते सतत नांगरोनी, कुळवोनी करिति भूमि ते नामी.
राखोनि शें सवाशें बिघे वसाहत सुरेख उठवाया;
पाऊण भाग त्यांनीं तयार केला तिथें पिकें व्हाया.
भूमी चिकण उदासम, उदय जिच्या ठेविला असे गांठीं,
ती योजिली पिकाया, गोराड्ड ती वसाहतीसाठीं.
देशी खतेंहि कांहीं सुचविति जे जरठ जाणते लोक,
तीं घातलीं तयांनीं कृषिकर्माचा असे जयां शौक.
वैराण माळ ! त्याला स्वरूप आलें सुपीक शेताचें;
दावी प्रसादचिन्हच कुंजवनाच्या पुढील वेताचें !
तिकडे विहीर झाली तयार बहु रुंद आणि खोलीची;
अकरा हातांवरती माती लागे बरीच ओलीची.

चवदा हातांजवळीं तळ दिसलें, परि असेंच कातळ तें;
म्हणति मुकादम लावूं सुरुंग, पाणी जिवंत आतळतें !
मोतीपुऱ्याहुनी मग हुशारसा वेलदार तो आणी;
योजुनि सुरुंग त्यानें फोडुनि पाताळ काढिलें पाणी !
जीवंत निर्झराचा निर्मळ तो स्रोत सारखा चाले !
वरतोनि पाहणारे अमृतानंदांत डुंबते झाले !
तंव वेलदार बोले,–" आतां पिकवोनि घ्या इथें मोती !"
" मोतीपुऱ्यांतला तूं ! तूं मोत्यांची अम्हां दिली खोती !"
ऐशा सुविनोदासह दुर्लभ शिरपाव देतसे त्याला,
चुकवोनि वाटखर्ची आनंदानें निरोपिता झाला.
घालुनि कामचलाऊ कुंपण विहिरीचिया मुखाभंवतें,
त्यानें अपघाताचे अपशकुनी टाळिलेच संभव ते.
फडशा करुनि मुकादम इजारदारहि तदा विदा केला.
सज्जनसिंगासंगें खूप हुरूपांत तो घरीं गेला. १२

## १३ खोंड्याची लावणी

ज्यांच्या परिश्रमांवरि ह्या राष्ट्राचा उभा असे झेंडा.
त्या ढवळ्यापवळ्यांना द्याया सुग्रास पेरिला खोंडा.
तंव माहुटें जहालें ! कारणवृष्टीच* ती समृद्धीची.
अनुकूलता निशाणी आहे भावी स्व–कार्यसिद्धीची.+
आणोनिया गवंडी विहिरीला पाळ आणि थारोळें
केले सुलभ जलाशय भूतदया सज्जनांत आंदोळे.
विहिरींतिल मातीचा उतार मग ढाळिला उगवतेला;
तुळवट उभें करोनी सुतार चाक्याहि लाउनी गेला.

---

* समृद्धीला कारणीभूत होणारी वृष्टी. + अर्थान्तरन्यास अलंकार. Cf:—
" अव्याक्षेपो भविष्यन्त्याः कार्यसिद्धेर्हि लक्षणम् ।"—कालिदास.

चौफेर त्या गड्यांनीं शेतांतुनि पाट निर्मिले बांद;
सोमा अवचित आला. शुद्ध बिजेचाच तो गमे चांद !

तो रामराम करुनी धन्यास म्हणतो,–" असेंच हाजर मी.
" हें शेत छान झालें ! पाणी आलें ! सुखास काय कमी !
" सुकलेंच बांधकामहि; आतां मोटा खुशाल चालूं द्या.
" मी येवोनि रहातों. बघतों काडी इथोनि हालूं द्या !"

" नाइक !" सज्जन वदला, लवकर या वचन पाळुनी अपलें.
" येथील मालमत्ता अपली जाणोनि पाहिजे जपलें.

तुमची खोली, पडवी, करितों ह्या कुंपणासही झांपा;
धान्यहि भरोनि देतों. भिउनि रहा ईश्वरास माबापा."
केलें तसें तयांनीं. सोमानाईक येउनी वसले.
मोटा चालू झाल्या. भिजोनियां शेत तर्र तें दिसलें ! १•

## १४ हवेची शुद्धि व बांदांचा शृंगार

शेतांत दुर्लभाच्या होते कडुनिंब थोरले रोपे;
गाड्यांत आणिले ते तेथें वाहोनि सर्व साक्षोपें.

दक्षिण–पश्चिमभागीं कुंपाशीं रोपिलेच हारीनें.
आळीं करोनि त्यांना पाणी दिधलें तुषार–झारीनें.
ज्यांच्या " परितो भद्रम् " नांदे, ते पारिभद्र बालतरू
अल्पावधींत झाले ! गौरव त्यांचा टुक्यांत काय करूं !
त्यांच्यावरोनि येती झुळझुळ लहरी सदैव वायूच्या.
कडवे निंब ! तरी पण, पाजिति हो वनसुधा चिरायूच्या !

जवळील ठाकुराचा अवचित रस्त्यांत भेटला माळी.
सांगोनि वृत्त दुर्लभ त्यास म्हणे,–" येत जा कधीं काळीं.
लावोनि फूलझाडें करोनि दे साजरा जरा बाग.
खूष करीन तुला मी, पडोस–धर्मास तूं तुझ्या जाग."

माळी गबा म्हणाला,—“ गुलाब आहेत जातजातींचे,
छाटावयास झाले कण्हेर कांहीं सुरेख भांतीचे.
कलमें करोनि त्यांचीं परवां येईन मी मळ्यामाजीं;
देईन रोपुनी तीं. कदर करा याद राखुनी माझी.
या कलमांस हवें तें खतही शिलकेंत ठेविलें कांहीं;
तेंही आणुनि घालिन. कृपा सदा आपली असों द्या ही.”
त्या अन्वयें गबानें कलमें आणोनि लाविलीं सारीं.
सजले बांद तिन्ही ते सन्मुखचे काटकोन आकारी.
अलटोनि पालटोनी कण्हेर बहुविध गुलाब रंगांचे
भासति आज तिथें जणु मिटलेले पंख ते पतंगांचे !
खत घालोनि हिताचें, पाणी दे तो स्वयेंच कलमांतें.
बक्षिस बघोनि हंसला. येइन बदला करोनि नमनातें.
तेथिल गड्यांस सांगे, शिंपित जा रोज रोज कलमांना.
ना तरि सुकुनि उन्हानें पानें देतील टाकुनी माना.
महिन्या दो महिन्यांनीं हिरवा दरिया असें झुले खोंडें !
चमकति कण्हेर कोठें, कुठें गुलाबच, कुठें तुरे, गोंडे ! १४

## १५ सुधारणाजनक अगस्तींचाच लाभ

एके दिवशीं गेले सुमित्र दोघेहि ते महालांत.
‘ संस्थापना ’ असे हें लिखित तयांच्या अदृश्य भालांत.
सारुनि अनेक कामें, नोंदीची नकल घ्यावया दोघे
कार्यालयांत आले. अधिकारी असति तेधवां मोघे.
या वेळीं त्यांजवळीं होते कोणी गृहस्थ बसले. ते
सेवानिवृत्त दिसले. घेउनि दोघे प्रणाम हंसले ते.
मोघे त्या सभ्याला ओळख सांगोनि ह्या सुमित्रांची,
पुशितात दुर्लभातें प्रगती त्याच्या स्वतंत्र तंत्राची.
त्यानें अद्यावधिचें निरोपिलें वर्तमान माळाचें.
मोघे म्हणती,—“ आणा स्वरूप त्याला नवीन काळाचें.

माळी गवा म्हणाला,—“ गुलाब आहेत जातजातींचे,
छाटावयास झाले कण्हेर कांहीं सुरेख भांतींचे.
कलमें करोनि त्यांचीं परवां येईन मी मळ्यामाजीं;
देईन रोपुनी तीं. कदर करा याद राखुनी माझी.
या कलमांस हवें तें खतही शिलकेंत ठेविलें कांहीं;
तेंही आणुनि घालिन. कृपा सदा आपली असों द्या ही.”
त्या अन्वयें गवानें कलमें आणोनि लाविलीं सारीं.
सजले बांद तिन्ही ते सन्मुखचे काटकोन आकारी.
अलटोनि पालटोनी कण्हेर बहुविध गुलाब रंगांचे
भासति आज तिथें जणु मिटलेले पंख ते पतंगांचे !
खत घालोनि हिताचें, पाणी दे तो स्वयेंच कलमांतें.
बक्षिस बघोनि हंसला. येइन वदला करोनि नमनातें.
तेथिल गड्यांस सांगे, शिंपित जा रोज रोज कलमांना.
ना तरि सुकुनि उन्हानें पानें देतील टाकुनी माना.
महिन्या दो महिन्यांनीं हिरवा दरिया असें झुले खोंडे !
चमकति कण्हेर कोठें, कुठें गुलाबच, कुठें तुरे, गोंडे ! १४

## १५ सुधारणाजनक अगस्तींचाच लाभ

एके दिवशीं गेले सुमित्र दोघेहि ते महालांत.
‘ संस्थापना ’ असे हें लिखित तयांच्या अदृश्य भालांत.
सारुनि अनेक कामें, नोंदीची नकल घ्यावया दोघे
कार्यालयांत आले. अधिकारी असति तेधवां मोघे.
या वेळीं त्यांजवळीं होते कोणी गृहस्थ बसले. ते
सेवानिवृत्त दिसले. घेउनि दोघे प्रणाम हंसले ते.
मोघे त्या सभ्याला ओळख सांगोनि ह्या सुमित्रांची,
पुशितात दुर्लभातें प्रगती त्याच्या स्वतंत्र तंत्राची.
त्यानें अद्यावधिचें निरोपिलें वर्तमान माळाचें.
मोघे म्हणती,–“ आणा स्वरूप त्याला नवीन काळाचें.

इजनेर ' हें तुम्हांला देतों. जा यांस घेउनी तेथें.
यानप्रस्थ कराया यांना स्थल फार योग्य आहे तें !
हे राहतील तेथें, ऋषिचें जीवन पवित्र नेतील.
नमुनेदार वसाहत थोड्या खर्चें करोनि देतील.
यांचा विशेष हा कीं, कीर्तन हरिचें रसाळ हे करिती.
त्या वृष्टिनें मनाचीं झुलति पिकें येउनी तुऱ्यांवरतीं !
यांच्या निरूपणाचीं अमृतफळें गुर्जरांसही रुचलीं.
तुमच्या सुदैवयोगें समजा ही कल्पना मला सुचली.
ऋषि हेच ते अगस्ती ! माळमळा यांस आज तो दावा.
सहजीं तुम्हां मिळाला, लागतसे जो परीस शोधावा !
दुसरी गोष्ट तुम्हांला सांगाया धरुनि मी असें ध्यास.
या सज्जनास तुमच्या शिकावया पाठवा बडोद्यास.
कृषिकर्म-शिक्षणाचा तेथ असे काढिला नवा वर्ग.
त्यांतुनि तयार होतां, आणिल ह्या भूवरीच हा स्वर्ग !
पालनगृह रोप्यांचें आहे आदर्शरूप शेत तिथें.
ज्ञानानुभवहि देती. रोपें, कलमें, सुबीजही मिळतें.
रुपये सरासरीनें अडीचशें लागतील वर्षाला.
तितुके वेचुनि मिळवा उत्कर्षाच्या अखंड हर्षाला.
घ्या, ही नकलहि आली; करुनि सही मी तुम्हांस ही देतों."
दुर्लभ नमुनि तयांना, हंसत वदे,-" ऋषिवरांस मी नेतों." १५

## १६ वसाहतीची रूपरेखा

ऋषिवर, दुर्लभ, सज्जन, घोडागाडींतुनी तिघे आले.
पडवींत नाइकांच्या त्यांचें आतिथ्य गांवठी झालें.
ऋषिवर्यांनीं आधीं विहीर, अवलोकिलें तिचें पाणी.
तें काढवोनि ताजें, केलें गंडूष, पानही त्यांणीं.
ते मान डोलवोनी म्हणती " हें अमृत लागलें हातां !
यानें पिकेल सोनें, होइल आरोग्य सर्वदा साथी.

ही किमया, ही किस्मत तुह्मांवरी संपदा फिदा झाली !
किस्मतपूरच वाटे वसवाया चालुनी इथें आली !"
लावोनि दूरदर्शक आणुनि टप्यांत दूरचा टापू,
म्हणती,–"सहज पहातों नक्शासाठीं, अचूक मग मापूं.
स्थल मोहऱ्यावरींचें ! असती चाऱ्ही दिशा खुल्या येथें.
तेणें खुलुनि उठेलचि करूं इथें बांधकाम जें जें तें.
सुंदर आणि सुखावह रचना होईल सारिपाटाची.
मध्यावरी हवेली जमीनदारास योग्य थाटाची.
गांवांत चार रस्ते सभोंवतींच्या पथास मिळणारे,
ठेवूं दरेक मार्गी सहा सहा विरलशीं घरें दारें.
मागें पुढें घरांच्या परसें, लघु पुष्पवाटिका ठेवूं.
वाड्यासभोंवतालीं भू-नंदनवन उभारुनी देवूं.
कोनांस जोडणारे उपपथ मिळतील चार पंथांतें,
बागेवाहेरुनि हे रहदारीचेच पंथ गत्यांतें.
येथें मलापकर्षक दरेक मार्गास दोन योजावे.
प्रति मार्गाच्या अंतीं निवास त्यांचेहि दोन मोजावे.
कूपावरि घटयंत्राचि ठेवूं जल काढण्यास सोईचें.
भिजवोनि शेत सहजीं भरील तें हौद पाणपोईचे.
ठेवोनि एक टांकी उंचावरि ती भरूं पऱ्हाळीनें.
घ्यावें विपुळ नळोदक सांज-सकाळीं दरेक आळीनें.
आतां चौकोनाच्या वसतीखेरीज चार ज्या जागा
उरल्या खुल्या तयांवरि जें जें करणें असेल, तें सांगा."
सज्जन वदला,–"येथें आहे शेतासमीप माताजी,
मंदिर बांधुनि वसवूं; करूं तियेची घडेल सेवा जी.
तैसें शिवमंदिरही एक सभामंडपासवें बांधूं.
यांतुनि बहुविध उत्सव, आणि कथा कीर्तनें अम्हीं साधूं."
ऋषिवर म्हणती—"झाले यथार्थ विनियोग दोन कोनांचे.
विश्रामभुवन, शाळा करूं सदुपयोग यांस कोणांचे.

सोमाजवळच येथें सभ्यां बांधोनि झोंपडी माझी,
दाविन तुम्हां चमत्कृति, करीन किस्मत्पुरासही राजी.
माझ्या मदतीसाठीं एक गुमास्ता हुशारसा द्यावा.
त्यानें वसाहतीस्तव रहिवाशी शोधुनीच बोधावा.
रहिवाशानें येथें निजखर्चानें मकान बांधावें.
दशवर्षावधि त्याला घरभाडें माफ आपलें व्हावें.
आणिक दोन बिघ्यांचें निव्वळ उत्पन्न त्याच मुदतींचें,
त्यास बहाल करावें. आमिष हें होय रास्त रीतीचें.
उगवेल रकम त्याची, त्यास सुखाचा निवास लाभोनि,
येथिल सुखें अमोलिक मिळतिल धंदा स्वकीय साधोनी
केवळ अकिंचनाला व्याजानें रकम मीहि देईन.
तरिही पांचापेक्षां अधिक कुळें मी अशीं न घेईन.
दोन उमाळ्यावरिचे पथ ठेवूं खानदान लोकांला;
कर्षक, कारू, नारू वसतिल हे दोन अन्य टोंकांला.
माझा जन्मच गेला सगळा ह्या बांधकाम-खात्यांत;
" आहेत परिचयाचे सर्वहि जे लोक राबती त्यांत.
सोंपूं वसाहतीचें काम भल्याशा इजारदारातें.
मग देखरेख उरली. तें माझें काम येतसें मातें.
कर्षक सहा भलेसे करा उभे यावयास पहिल्यानें.
सभ्य घरंदाजांना वळवुनि मी आणितोंच सल्ल्यानें.
कृषिकर्म-शिक्षकाला पाठवितों लिखित मी बडोद्यास.
सज्जन यानें जावें तिथें करावा झटून अभ्यास.
आतां उशीर झाला, जातों; मी नित्य येत जाईन.
जें काम घेतलें तें आतां अंतावधीच साधीन. "
गाडींत ऋषिवरांना पोंचवुनी उभय मित्र ते आले.
सोमास शेत सोंपुनि ऋषिचे गुण गात चालते झाले. २७

पूर्वार्ध समाप्त.

(उत्तरार्ध--साकी)

## १ (अ) चव्हाणांच्या घरीं

वर्गगुरूंचें अनुमोदन तें शनिवारींच मिळालें.
उभय मित्र मग त्या नमुन्याच्या शेतावरुनि निघाले
दोचाकीवरि शीघ्रगतीनें चालति राजपथांत;
परस्परांच्या मानांवरती असति तयांचे हात.
विश्वासाच्या सव्य कराचें जोखड सज्जन वाही.
हारासम तद् वामहस्त तो विश्वासासच वाही.
सन्मित्राचि ते त्वरित केवडा–बागेकडेच वळले.
शिंग वाजतां तदागमन तें बंगल्यामधोनि कळलें.
नोकर आला; त्यानें यानें तीं लाविलीं ठिकाणीं,
बाग बंगला सज्जन पाही थांबोनि कौतुकानीं.
तो मित्राच्या मागुनि गेला दुसऱ्या मजल्यावरती,
आनंदानें स्वागत त्याचें विश्वासराव करिती.
अद्यावधिच्या शृंगारांनीं साजे दिवाणखाना,
मेवासांतिल सज्जन झाला वेडाच पाहतांना.
दिसति उभे ते कप्तानांच्या वेषांत रामराव
चव्हाण; वाटे वदतिल आतां, गेले करोनि नांव.
तंव हंसासम हंसगतीनें आल्या हंसाबाई,
निज मित्रातें चव्हाण सांगे, ह्या ममताळू आई.
तो उत्थापन–मान देउनी त्यांस करी नमनातें.
आई म्हणती–" इथें नसावा परकेपणा मनातें.
विश्वासाचे मित्र, तुम्हीही त्यासम माझ्या लेखीं.
मुलांत आदर–आतिथ्याची कां मिरवावी शेखी !
हें घर अपुलें जाणुनि बोला, बसा, हवें तें मागा;
आपुलकीचें ठेवुनि नातें, येथें खुशाल वागा.

विश्वासाच्या पत्रावरुनी अपुला परिचय झाला.
सौजन्याचा, सज्जनतेचा, अनुभवहि आज आला."
"आई ! यांचें नांवहि आहे 'सज्जनसिंग' खरें तें. !
यांचें विनयी प्रेमळ वर्तन मोहुनि गे मन घेतें !
मेवासामधिं असती घरचे मोठे जमीनदार;
विक्रमशाली रजपूतच हे दिलदार गे उदार !
यांचें दर्शन झाल्यापासुनि काय असेल असो तें,
वाटे यांशीं सख्य करावें ! मग आणिलेंच येथें.

यांचा अपुला गतजन्मींचा ऋणानुबंध असावा.
त्याविण माझा भाव अचानक यांवरि कसा वसावा !
अस्तु; घरासचि अपुल्या आले. असती आज उद्यां हे.
नंतर आपण बसोनि बोलूं. जेवण उरकूं द्या हें."

आई म्हणती-" किंचित आहे अवकाश, घ्या चहा हा."
प्रमिला पेले घेउनि आली. रुचिकर काय अहाहा !

ही "प्रेमाची खूण !" म्हणति "मज विसरूं नकाच !" पेले.
त्या पेल्यांनीं शिष्टाईचें नाजुक काम केलें !
स्वीकारुनि मुखशुद्धी सज्जन तेथिल चिजाहि पाही.
तो कुसुमांकित लेखाजवळीं येउनि उभाच राही.
विश्वासाला म्हणे-" काय लिहिलें सांग मला तें.
हस्ताक्षर मज लागत नाहीं. समजाविशील का तें !"
"सरहद्दीच्या रणांगणावरि 'कॅपटन्' चव्हाण गेले.
त्यांनीं 'कर्नल' माधवबाजीतुल्य पराक्रम केले.

सेनाधिपती लॉकहॉर्ट तो पाहुनि विजय निवाला.
प्रमाणपत्रें देउनि त्यानें गौरव त्यांचा केला.

मम वडिलांचें बंद हृदय हें ! प्रमाणपत्र कशाचें !
यांतुनि त्यांचे मूक यशोध्वनि अक्षय यावयाचे !

पुत्र-मित्र हे यांसह बोला ! बाबा, आपण बोला !
जो मरणानें अमरच झाला, त्या शद्वास अबोला ! *

नको नको हा अहो ! तुम्हांला अजरामरत्व आलें !
शहर वडोदें-' वीरक्षेत्रच '-हें सार्थनाम झालें ! "

विश्वासाचें भाषण ऐकुनि सज्जन गुंगुनि गेला.
अधिराजांचे प्रौढ पराक्रम चिंतीत राहियेला.

## (व) सहभोजन

माजघरामधिं पाटांवरची होती पंगत केली.
प्रमिला ताटें ठेवुनि आली; ' चला ! ' म्हणोनी गेली.

भोजन साधें शुद्ध निरामिष, तें श्रीखंड-पुरीचें.
त्यांत परोटे रेवाकांठी असतीहि बाजरीचे.

सुमती, प्रमिला, सून लेंकही साग्रह वाढित होती.
कांचकंवळामधुनि विजेच्या झळकत होत्या ज्योती.

" आज भोजनानंतर आम्ही ऐकूंच दिल्‌रुबा तो. "
विश्वास म्हणे-" प्रमिले ! नाचव रस भावही उभा तो !

म्हणशिल तर मी साथ कराया नुसता धरिन ठेका.
मेवासांतुनि यांस कला ही स्वप्नीं दिसे कुठे का ! "

भोजन झालें. विडे घेउनी बिछायतीवरि आले.
चित्रकलेचा संग्रह बघतां ते कौतुकें रिझाले. २४

---

*Cf:--The inscription carved on the tomb of Tennyson, words eloquent in their brevity:—

" Speak living voice ! with thee, death is not death !

" Thy life outlives the life of dust and breath."

## २ (अ) दिलरुब्याचा जलसा

भोजन सारुनि अवरासावर करोनि घाईघाई
बंगल्यामध्यें प्रमिला, सुमती, आल्या हंसाबाई.

प्रमिलेजवळीं तिचा लाडका होताच दिल्रुबा तो.
मुका असोनी मधुर बोलका ! झुलवी रसिकसभा तो.

लय लावोनी कुशल कुमारी रम्य सुरावट छेडी;
सर्व मंडळी हरणांसम ती झाली वेधुनि वेडी !

स्वरवैभव तें बंगल्यामधुनी जणो तरंगत राहे.
विश्वासाला हंसत पुसे ती—" काय ! तयारी आहे !"

घेउनि डग्गा त्यानें धरिला सांगितलेला ठेका.
अतीव मंजुल मधुर चिजांचा लागुनि राहे झोका.

प्रथम तियेनें ' यमन ' छेडिला सुस्वर विहाग फार.
वाजविला मग समय न मानुनि ' वसंत ' आणि ' बहार '.

बहुजन बहुधा नादलुब्ध; हा नादावरीच भुलतो.
रसवंतांचा सुविरल भोक्ता तो रसभावें खुलतो.

असो नसो वा कलानिपुण तो हृदयच त्या रसिकाचें
रस—भावांवारि नैसर्गिक तें लोलुप असतें साचें.

अनभिज्ञांना न रागदारी ही रंजवी बघोनी,
सोडियली मग भावमयी ही ठुमरी तिनें मधोनीः—

" दरसन बिन जियरा तरसे ! ध्रुव०

घडिघडि दिनदिन कल न पडत,
नहि धरत धीर मन, नीर नैनसे बरसे." इ० इ०

प्रमिला आधीं भावगीत हें गाउनि मंजु रवानें
तंतुतरंगीं रंगवि मग तें ध्वनिबिंब कौतुकानें.

यांत नायिका निज नाथाच्या प्रेमांत गुंतलेली,
त्याजपासुनी वियुक्त आहे भेटावया भुकेली.

संतत खंत करोनि तयाची मृदु संबोधन-माला
समर्पुनी, ती परोपरीनें अळवीतसे तयाला.
हृदयामधले भाव तियेचे चैतन्य पावुनी ते
रंगावरती चतुर नटासम विलसत बोलत होते.
केवल नादब्रह्मच तेथें उचंबळोनी आलें.
सज्जनमन हें चित्र साखरीं, त्याचें सरबत झालें!

## (ब) आराम

जलशानंतर जणो विजेच्या दीपांतुनी निघाली
प्रसन्नता ही धवल चंद्रिका तेथें हांसत आली.
सखि जिवलग ही त्या प्रमिलेची निजपार्शीच विराजे.
बघती सारे टकमक तिजला, हा पुष्पहार साजे!
सज्जन वदला-" वाद्य खरोखर फारच बहारदार!
यास दिल्रुबा ह्मणती का! हें नांवासम दिलदार!
यांचा हातहि फारच हलका, आहे केवळ वारें!
काय मजा पण् मजा! वरसलें अमृत खरोखर वा रे!"
विश्वासासह गप्पागोष्टी, हास्यविनोदहि झाला.
वरीच झाली रात्र ह्मणुनि तो उठला निजावयाला.
प्रमाणपत्राजवळ घडीच्या पर्यंकींच बिछाना
'राघू' यानें ठेवियलासे घालोनि पाहुण्यांना.
विश्वासानें त्यास कराया आराम त्या ठिकाणीं
सांगुनि उठली सर्व मंडळी सस्मित अशा मुखांनीं.
गवसणिमधुनी मुका सुविनयी घालोनि दिल्रुबा, ती
प्रमिला सज्जनमुखास बघुनी सस्मित झाली जाती.
झारींतिल जल शीतल पिउनी, गोशा करुनि विजेला,
त्या एकांतीं प्रार्थितसे तो कुमार आज निजेला. २१

## ३ सज्जनाचें मनोगत

मेघासांतिल वैराणीं जीं आकाशांतुनि आली,
" जी नयनांवरि घारी ऐशी सहसा झेंपच घाली,
थकवा, खेद, धुडावुनि लावी मारोनि जी चपेटे,
जिच्या प्रभावें स्वर्गामधली सरदारखाहि भेटे,
चतुर सखीसम लपुनि जियेनें मजलाच भासमान
केली प्रेमलदेवी साक्षात् देवांगनेसमान !

ती हितकारिणी निद्रा माझी रुसली मजवरि काय !
प्राप्तीसाठीं तिच्या करूं मी येथें काय उपाय !

झोंप न येतां, सवेग येती कल्लोळ संशयांचे,
तुफानसे हे असति अनावर. आवरतात कशाचे !

ह्या प्रमिलेंतुनि भासतसे मज माझी प्रेमलदेवी !
सादृश्य तिचें तंतोतंतच आलें हिच्यांत केवीं !

वाजवितां दिल्-रुबा हिचें जें प्रतिबिंब आरशांत
विलसतसें तें प्रेमलदेवी–सम गोजिरें नितांत !

तें डाव्याचें दिसले उजवें, डावें मज उजव्याचें.
उलटे सुलटे फसवे फांसे दोन्ही जणो जुव्याचे !

प्रेमलदेवी ! प्रमिला होउनि आलीस का इथें तूं !
परि हें कोडें; असुगम मजला. सोडविं तुझ्या पथें तूं.

प्रमिला झाली असशिल तरि तूं भेट मला; हो माझी.
प्रेमानें कर धरिला, त्यावरि करूं नको इतराजी. "

वाऱ्यावरि मन पडलेलें तें वाऱ्यासवेंच धांवें.
विश्रांतीला झोंपेला, तें कैसें वरें बघावें ?

धांवुनि धांवुनि थकलें, तेव्हां ग्लानी येउनि पडलें.
त्या तंद्रेंतुनि दिनराजाचें पुनरागमनहि घडलें ! १२

## ४ सकाळचें चहापान

विश्वासानें येउनि केलें जागे कुमार याला.
"गच्चीवरि मुखमार्जन उरका"--वदला "चहाहि झाला."

माजघरांतुनि मेजावरती ते चाहती चहातें.
'साठे बंधू' बनुनि 'भिस्कुटें' खपती इथें पहा ते !

प्रमिला सज्जन बसले होते सन्मुख परस्परांचें.
त्यांतुनि आतां चालू झाले विनिमय तदन्तरांचें.

सज्जन वदला-" आपण दिसतां आज मलूल अशा कां !
झोंप न आल्यानें का गेला तकवा आणि अवांका ! "

हा कुसुमांचा शर बगलेंतुनि निघोनि गेला पार,
तरिहि तयानें थरकविलें तें हृदय तिचें सुकुमार !

ती उद्गारली,-" खरेंच, मजला झोंप न आली काल;
त्यांतुनि पडलें स्वप्न असें कीं, त्याला तंत न ताल ! "

" तें काय ! " असें सज्जन पुसतां उत्तर आलें नाहीं.
स्निग्ध कटाक्षें अधोमुखी ती सस्मित त्यातें पाही.

ही प्रेमाची 'स्पून' म्हणे तो होता तेथचि प्याला;
त्यावरिचें तें लिखित तियेनें दर्शविलेंहि तयाला.

ह्या संकेतें स्वप्न तियेचें त्याला कळोनि आलें.
त्याचें कोडें तिनें खुबीनें सोडवितां मन धालें.

हें प्रेमाचें बीजारोपण त्यांचें त्यांसचि ठावें.
त्याचा गंधहि इतरांसि न ये त्या मधुर मुग्ध भावें.

या समयीं त्या प्रणयि जनांच्या अनुपम हितावहानें
संजीविनिचें न कळत केलें सत्कार्य त्या चहानें !

तें प्रिय सखिचें हृद्गत कळतां त्या चतुरशा कुमारें
हास्य विनोदें चव्हाण मंडळ केलें गारचि सारें ! १२

## ५ भोजनावधीचा कार्यक्रम

मग बंगल्याच्या बागेंतुनि ते सहजगती सहलीला,
सहलीमधुनी सौजन्याच्या करिती नाजुक लीला.
बागेमधुनी विविध फुलांचा आला असे बहार.
हास्य तयाचें त्यांच्या वदनीं खेळुनि दिसे बहार!
प्रमिलेनें तंव अर्ध फुलेले खुडिले चार गुलाब.
त्या दोघांतें हसतमुखी दे दोन फुलांचा लाभ.
मग सुमतीच्या बुचड्यावरती एक कळा ती खोवी;
सुमती दुसरा निज नणदेच्या केशकलापीं गोवी.
सज्जन यानें निशिगंध इथें पहिलाच पाहियेला.
धवलपणा मृदु सुगंध, त्याचा आकार चाहियेला.
प्रमिला वदली यांचे गजरे करितों सुंदर आम्ही.
दिवसापेक्षां रात्रीं येतो यांना सुवास नामी.
जातांना मी देइन यांची कलगी करुनि तुम्हांला.
ही कलगीची सलगी पाहुनि सज्जन मनीं निवाला.
नंतर बंगल्यामधिं येउनि ते स्नानें अल्पाहार
करुनी, पत्ते खेळत बसले बनुनि गडी गुलजार.
विश्वासाच्या सन्मुख सज्जन, नणदे समोर सुमती;
लागुनि जोड्या हंसति विनोदें ते गमतीनें रमती.
नणदे ऐशी भावजईही होती चतुर खिलाडू,
म्हणती आतां पिसवुनि पिसवुनि भुस्कट् तुमचें पाडूं !
आणि खरोखर तसेंच झालें सज्जन–विश्वासांचें !
बारा वेळां पिसुनि बिचारे गेले थकोनि साचे !
हंसाबाई येउनि म्हणती–“ खेळ पुरे हा तुमचा !
गोंगाटानें तुमच्या झाला बेजार जीव अमचा !
जेवायाचें देखिल नाहीं कसें तुम्हांला भान !
बारा वाजावयास झालें ! उठा घड्याळ पहा न !

रविवार तुम्हां काळ–दुपारच करा असें कां सांगे ?
" उठा, मुलींनो ! ताटें वाढा, कराहि यांना जागे."
मग त्या उठल्या, मेजावरती आणिलीं ताटें त्यांनीं
आज केशरी भात असे, ती मिष्टीच मेजवानी !
यथेष्ट भोजन करुनी दोघे तांबूल खात आले.
भट्टांपरि तें तट्ट फुगोनी लंबायमान झाले ! १६

## ६ पहिल्या भेटीचा समारोप

विश्वास पुसे–" आई, आम्ही माजलपुरास जाऊं ?
तूं म्हणशिल तर शेतहि अपुलें ह्या पाहुण्यांस दावूं."
" जातां येईल पुढें कधींही," म्हणती हंसाबाई;
" धांवत येउनि पळत जायचें ! सगळी एकच घाई !
उसंत म्हणुनी जिवास नाहीं; नाहीं मनास आळा.
झालें, फिरुनी उद्यां सकाळीं अभ्यास आणि शाळा;
होईल अत्ता वेळ जायची. अमळ विसांवा घ्या ना !
सुख लागूं द्या जरा जिवाला; तैसेंच पाहूण्यांना."
मग सहलीचा बेत बदलुनी स्वस्थ असे ते बसले.
हें प्रमिलेला बरेंच झालें. तन्मुख गुलगुल हंसलें !
माजलपुरची बंगल्यांतच ती मग माजली खुशाली !
स्वादु फळें ते चाखित असतां वेळ चहाची झाली.
सायंकाळीं कपडे घालुनि घेती सखे चहा ते.
आदर्शांच्या शेतावरती निघतात जावयातें.
तों प्रमिला ती निशिगंधाची कलगी घेउनि आली.
सज्जनहस्तीं स्वहस्त मिळवुनि सस्मित देती झाली.
हंसाबाई वदल्या–"आतां हंमेश येत जावें,
हें घर अपुलें. सज्जन कवणा नको ? आम्हांसहि व्हावे.

म्हणुनिच म्हणतें, यावें जावें यांच्यासवें सदाही.
आल्या-गेल्यावांचुनि परिचय लोभहि वाढत नाहीं,
विश्वासावरि लोभ असूं द्या; प्रेम निरंतर ठेवा.
ह्या जन्त्रींतुनि घेण्याजोगा आहे प्रेमच मेवा !"
ते आईतें नमन करोनी, घेउनि डबे निघाले.
चव्हाण-मंडळ झांप्यावरती पोंचविण्याला आले.
प्रमिलानयनें डबडबलीं, ती मानेनेंच खुणावी;
सज्जन तिजला सस्पृह बघतां उलटें दुःख दुणावी !
दोचार्कीनीं सत्वर आले ते मुक्कामावरती.
प्रमिलेचें मन हरलें गेलें; नयन-उन्हाळे झरती ! १४

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## ७ (अ) ताजी आठवण

हे विद्यार्थी एकच कालीं ह्या वर्गीतुनि आले,
तेणें वसतीगृहांत त्यांचें वास्तव्य एक झालें.
त्या योगानें सहवासाचा संतत लाभ मिळोनी,
तन्मैत्रींतुनि बंधुत्वाचा ये रंग आढळोनी.
विश्वासाच्या पाहुणचारें गहिरेपणा तयाला
येउनि आतां प्रणयरंग तो जणु गुलनारी झाला.
रात्रीं त्यांनीं डब्यांमधोनी केले अल्पाहार;
चव्हाण ह्यांच्या आगत्याची वाखाणिली बहार.
निशिगंधांची प्रफुल्ल कलगी डोळे, नाक, मुखातें
लावुनि, सज्जन घेता झाला त्या सौगंध-सुखातें.
विश्वासाच्या समीप शय्या करोनियां तो निजला;
प्रेमाश्रूंनीं आज उशीचा गलेफ त्याच्या भिजला.
"हे प्रमिले ! हे प्रेमलदेवी ! होशील काय माझी ?
स्मृतिच तुझी ही घमघमताहे कलगींमधोनि ताजी.
तव भेटीचा सुयोग केव्हां येइल पुन्हां सखे ! तो ?
त्याजकडे मी लावुनि डोळे झोंप न येतां घेतों."

## (ब) शिक्षणाची रूपरेखा

उठुनि सकाळीं नित्यविधी ते उरकुनि बागेमाजीं
गेले बागाईत शिकाया हाजर होउनि आजी.
कृषिकर्माचें ज्ञान तयांना सांगोपांग मिळालें;
त्या ज्ञानाचें साक्षादनुभव कामें करोनि आले.
ते जमिनींच्या जाणति जाती, गुणधर्महीं तयांचे;
वैगुण्यांचें दूरीकरणहि शिकले विविध पथांचें.
भिन्न खतांच्या कृती कळोनि तद्गुण—परिचय झाले;
भूमींचें कस वाढविण्याचें हें ज्ञान त्यांस आलें.
पर्जन्याचीं प्रमुख कारणें केलीं मनन तयांनीं.
हिताऽहिताचे अभ्यासियले वातहि शास्त्रमतांनीं.
ते वृष्टीची गर्भधारणा—चिन्हें सुवर्षणांचीं,
दुश्चिन्हेंही जाणूं शकती घातक अवर्षणांचीं.
उदकांचे गुणधर्म जाणती ते सदुपयोग त्यांचे;
चिन्हांवरुनी उगम ताडिती भूमींतल्या झऱ्यांचे.
सद्बीजांचें उत्पादन, त्या हितकर संग्रहरीती,
तत्परिणामक लाभांचाही अभ्यास ते करीती.
अद्यावधिचीं सुधारलेलीं औतें आणि हत्यारें,
परिचित झाले त्यांस तयांचे सौकर्य-लाभ सारे.
त्यांस पशूंची जातिपरीक्षा, उन्नयनमार्ग त्यांचे
तैसे बहुविध रोगहि कळले, तदुपाय अनुभवाचे.
गोठाणाचें आरोग्यहि ते जाणति निगा पशूंची;
त्यांना महती कळली दुभत्या गाई आणि म्हशींची.
शिक्षण घेउनि जिराइती ते बागाइतांत वळले.
आणिल भूवरि नंदनवन ही कला तयांना कळलें.
बहुविध रोपें, कलमें करणें जोपासना तयांची,
पुष्प—फलांचे वृक्ष, लता, ही जाणीव रंजनाची !

जिज्ञासेनें बहु सायासें अभ्यासिली तयांनीं;
ह्या वस्तूंचें मननहि केलें उपयोग कौतुकांनीं.
ते बहुपरींचे भाजीपाले, दैनिक उपयोगाचे
सजविती जिन्नस मातबरांच्या नामी उपभोगांचे.
एरंडांचीं सेवुनि पानें रेशीम जंतु करिती;
कोसंब्याच्या संस्थेंतुनि ते शिकले सुपद्धती ती.
मुंबाविद्यापीठामधले चव्हाण बी. ए. होते.
कृषिकर्माचें आंग्ल–ज्ञानहि ते पेरिती सभोंतें.
सज्जन याशीं संभाषण ते करिति मराठीमाजीं.
ती बोलीही तयास आली; कीं तन्मतीहि ताजी.

## (क) यशस्वी परिपूर्णता

अभ्यासक्रम पूर्ण होउनी वैशाखांताचि झालें
वर्गपरीक्षण; त्यांत तयांना यश मानांसह आलें !
त्या संस्मृतिचा यशवंतांनीं ‘ उत्सव ’ साजवीला.
त्यांत गुरुंना नव–कवितेसह आमंत्रिलें कवीला.
मग वन-भोजन, पानसुपारी, अत्तर-गुलाब झालें.
हारालंकृत वर्ग–गुरूंचें छायाचित्र निघालें.
यशवंतांना प्रमाणपत्रें थोर सभेंत मिळालीं.
जय–हर्षांची जणु ती जोडी परतुनि घरास गेली.

## ८ विजयानंद

आगमनाचा दिवस तयांनीं तैसाच वेळ, काळ,
निज भगिनीला कळवुनि पत्रें दिधलीं असेच भाळ.
त्या संदेशें मार्गस्थांच्या दोचाकींचीं शिंगें
ऐकुनि ‘ आले ! ’ म्हणुनि बघूं ये ती व्यग्र अंतरंगें.

यापरि फसतां अनेक वेळीं मित्र खरोखर आले.
बघुनि सज्जना अनुरागानें तन्मुख अरुणित झालें!
हंसाबाई पुढेंच आधीं सुमती लगबग आली.
विश्वासाचें 'पास!' असें वच ऐकुनि हर्षित झाली.
प्रमिला वदली हंसत कुमारा—"आतां आणा पेढे!"
विश्वास ह्मणे—"आपण द्यावे कीं घ्यावे? हा वेडे!"
मग त्यासाठीं दिले तयानें रुपये दोन तियेला.
त्वरित तियेनें त्या कामाला राघूहि योजियेला.
हंसाबाई प्रभृति जनांतें नंतर त्या उभयांनीं
प्रमाणपत्रें दाखविलीं निज सानंद कौतुकांनीं.
प्रमिला पेले घेउनि आली स्वादिष्टसे चहाचे;
शीण हराया प्राशन झालें मग त्या हितावहाचें.
मग चांदीच्या तबकांतुनि ती सुमती पेढे आणी.
कंदीपेढे ह्मणति कशाला हें फळविलें तयांणीं!
आज दुपारीं शेतावरती निज पाहुण्यांस न्यावें,
वतन आपुलें दावुनि त्यांना वनभोजनही द्यावें;
त्या पेढ्यांच्या स्वादसुखांतचि हा बेत खास ठरला.
झटुनि सर्व ते करिति तयारी उत्साह त्यांत भरला.
स्नान करोनी सज्जन बसला; घेउनि दैनिक वाची.
कारण, नव्हती मदत अपेक्षित ह्या कामांत तयाची.
साहित्यासह रांधपिणीला घेउनि, हंसाबाई
गाडीमधुनी पुढती गेल्या सांगुनि मुलास कांहीं.
तदन्वयें मग केला त्यानें बंदोबस्त घराचा.
मनोरथांचा रथहि निघाला प्रमिला-स्वयंवराचा! १४

## ९ रामधाम

ती चंपाई पातळ नेसुनि चांपेकळीच भासे.
गाडीमध्यें सज्जनसन्मुख बैसुनि गुलगुल हांसे.

झळकत होती आज सुमतिही नील नभांतिल तारा.
निर्माळींचे गजरे देती वासंतिक घमकारा !
आनंदाची सफर करोनी ते शेतावरि आले.
सज्जन मन तीं आंब्रेवाडी, वतन बघोनि रिझालें.

विहिरीसन्मुख टूमदारशी बंगली तिथें खुले ती.
सज्जांवरती चढुनि मल्लिका फुललीं फुलें–फुलें तीं !
बंगलीवरती ' रामधाम ' हें सुंदर नाम विराजे.
" पुष्पकरंडक " म्हणुनि बगीचा तिच्या समोंतीं साजे.

गाडीमधुनी चव्हाणमंडळ उतरोनि आंत शिरलें.
नेत्रपल्लवें त्या प्रमिलेनें सज्जन–हरणाचि हरलें !
माडीवरती सतरंजीवरि चिमकेंच गोल मेज,
असति आसनें मित वेतांचीं, कोचाची लघु शेज.

छत्रपती–गुरु, रामकृष्णगुरु, शिष्य विवेकानंद,
दिसति तुकोबा, रामतीर्थ, हे नित्य सुखाचे कंद.
चोंहीकडचें नयनमनोरम दर्शन येथुनि होई.
सुफलित होउनि डोलत होती ती आज आंब्रराई.

हा देखावा पाहुनि सज्जन केवळ मोहित झाला.
तो कोचावरि विसांवला; तीं चित्रें बघुनि रिझाला. १०



हंसाबाई, सुमति, गुंतल्या होत्याच पाकगेहीं.
तत्रस्थांना भेटति बोलति विश्वासराव तेही.

यास्तव आई म्हणे मुलीला–" जा दाव पाहुण्यांतें
शेत, मळा, निज बागबगीचा, येतिल कधीं पुन्हां ते ! "

आशा पडत्या फळापरी ही पथ्यावरीच पडली !
स्वहृदय–रमणा रमवाया ती नाहीं मुळींच अडली.

ती वासंती वनदेवी हो सहगामिनी तयाची;
प्रथमदर्शनापासुनि होती तत्कामिनीच साची.
भाव मनींचे व्यक्त कराया संधी चालुनि आली !
प्रियासवें ती हांसत बोलत शेताकडे निघाली.
नवयौवन हें तारुण्याच्या सौंदर्यासचि भुलतें.
तें मधुकरसें सुरसपिपासू अनुरागावरि झुलतें.
ह्या नियमाला अपवादक ती प्रमिला नसेच कांहीं.
ती शेतावरि लगट करोनी त्यासह चालत राही.
अंगस्पर्शामधिल विजेनें हृदयाकर्षण झालें.
घालुनि वळसा शेताला तें युग्म मळ्यांत रिघालें.
या समयाला पिकें नसोनी नुसतें शेत असे तें;
विस्ताराविण दर्शनीयसें त्यांतुनि किमपि नसे तें.
परि पाटस्थळ रम्य मळ्याचें हिरवें गारच होतें.
परोपरीचे भाजीपाले, खेळति पाट सभोंतें.
त्यांच्यामधला एक कालवा मार्गीं अडवा आला.
कुमार मारुनि सहज उडी तो त्या पैलपार झाला.
प्रमिला पडली पलीकडे ती तिजला न लंघवे तो.
सज्जन वदला–" थांबा. देउनि हात तुम्हांला घेतों. "
लांबविलेला हात तयाचा धरुनि बघे ती हांसे !
" काय पहासी, मार उडी, ये ! " तो वदला सहवासें.
त्या उड्डाणें झोंक तियेचा सज्जनहृदयीं गेला.
त्यानें प्रेमें कवळुनि धरिली, सांवरिलीहि तियेला.
तंव अनुरागें वदनबिंब तें ओथंबुनीच आलें.
हृदयें मिळुनी सस्मित मुरके, नेत्रकटाक्षहि झाले.
बहुता दिवशीं मालक येतां जन दर्शनास गेले.
म्हणुनि मळ्यांतिल हें संमेलन कुणिही न पाहियेलें.
मग हातामधि हात घालुनी प्रिय मित्र ते जिवाचे
मंद गतीनें क्रमितां करिती मृदु गुंजन मधुपांचें.

प्रमिला वदली–"हें तनु मन मी आज दिलें आपणांला.
आपणांसाठीं माझा जीवहि लावीन मी पणाला.
सांगा, आपण अपुल्या येथें मग न्याल ना अम्हांस!"
तन्मुख त्यानें कुरवाळुनि तो कर धरिला हृदयास.
"प्रमिले! प्रमिले! तूंच खरोखर माझी प्रेमलदेवी!
सर्वस्वाची धनीण तूं! मी जीव तुझ्यास्तव ठेवी!
जो परमात्मा सारें कांहीं व्यापूनि शेष उरला,
ठेवुनि साक्षी त्यास तुला मी वरिलें. तंव कर धरिला.
रूपवती तूं, कलावती तूं, रसिकहि तूं रंगेली!
प्रेमलदेवी! मी प्रिय तुजला, जाणुनि पसंत केली.
माझा सारा जम जमल्यावरि नेइन घरीं तुला मी.
हरकत कोणी पण न करो! ह्या प्रीतिविवाहा–कामीं."
"मी विश्वासाकडुनी घडवुनि आणीन सर्व कांहीं,"
प्रमिला म्हणते–"चिंता, संशय ठेवूं नये जराही."
हें वदतां, ते आम्रतरूंच्या कुंजामधेंच आले.
येथें 'कोकिलकूजित' चाले, अलि रसलोलुप झाले!
हें पाहुनि तो नीरक्षीरासम एकजीव झाला!
प्रेमसुधेचा तान्हेला तो अधरमधूही प्याला!
"काय गडे हें! आज घरीं कां नाहींच जावयाचें!
पाहिल कोणी, इथें मला हें नाहीं खपावयाचें!"
हा वरकांती रुसवा बघतां तो हंसत दूर झाला.
बागबगीचा, विहीर पाहुनि तिजसह परतुनि आला. २८

## ११ वनभोजन कीं गडगनेर?

हंसाबाई पुशिति तयातें,–"का पाहिलेंत सारें!"
"होय" म्हणे तो–"वतन काय पण रमणीय! वाहवा रे!
आतां आणिक फार मजेचें करितील 'राव' त्यातें.
कृषिकर्मामधि सन्मानासह असती 'पास' पहा ते."

सुमति खुशीनें हंसत विचारी--" बघिलीत आंबराई ! "
तोही हंसतच " होय " म्हणाला, " पण अझुनि पाड नाहीं."
" तो लागाया झाला आहे. लागेल एवढ्यांत,"
ऐसें चपखल उत्तरली ती, राहुनि उभी पुढ्यांत.
तंव सर्वांना भेटुनि बोलुनि विश्वासराव आले.
ते प्रमिलेच्या कामगिरीनें उलटे प्रसन्न झाले !
म्हणति तिला ते–" मजला दिसती तुमचीं मनें मिळालीं.
संमति तुमची अपेक्षितों मी, ती पाहिजे मिळाली !
मी तर म्हणतों, गडगनेर हा आजच असे तुम्हांला ! "
ऐकुनियां हें स्वानंदाची उकळी ये उभयांला.
तंव उसळोनी उद्गरला तो--" झालेंच काम ! आई !
सज्जनसिंगासंगें आतां करणार मी सगाई ! "
हंसाबाई म्हणती--" आतां तुमचें तुम्ही पहा तें.
एक दिलानें सुविचारानें जुळतां जुळवा नातें.
त्यांच्या मागें मीही येथें नांवापुरती राहें.
अमुचा लौकिक कायम ठेवा ! ही सार गोष्ट आहे."
हें ऐकोनी गहिंवरला तो, सज्जन मुखास पाही.
सज्जन त्याला कंवटाळुनियां क्षणभर तटस्थ राही.
" राव ! कशाला खेद बरें हा ? " हितगुज कुजबुजला तो.
" वरिली प्रमिला आदरिली मी, घेउनि तिला रहातों.
यावज्जीवहि दुःख तिला मी अंतर न द्यावयाचा."
सद्गद ऐशा विश्वासाचें मौनच होती वाचा.
त्याचा उजवा हात चुंबुनी सज्जन हृदयीं ठेवी.
वदला–" तुमची प्रमिला आहे माझी प्रेमलदेवी ! "
या वचनानें विश्वासाच्या स्मित वदनावरि आलें.
कंठालिंगन देउनि घाले, जिवलग हर्षित झाले.
तंव तै त्यांच्या आनंदाची वांटेकरीण आली.
" हितगुज तुमचें मला कळूं द्या ! " ऐसें हंसत म्हणाली.

" सज्जनसिंगाचि तुझिया कानीं कथितिल आज घरीं तें ! "
चमकून मुरका मारुनि गेली बिजलीच लाजरी ते !
मग सुमतीच्या करवीं सांगे आहे सर्व तयारी.
जेवण उरका; मग जायाला होइल विलंब भारी.
" हो हो ! " म्हणुनी उसळीसरसे रावहि हांसत उठले.
अर्धांगीसह ते पंक्तीचा थाट कराया झटले.
आज तयांनीं कामकरी जन बोलाविले अशेष.
सर्वहि आले. पंक्ती भरल्या. फुललें ' धाम ' विशेष.
हंसाबाई, प्रमिला, सुमती बसल्या स्त्रिया घरांत.
आज वाढपे वाढित होते सर्वांस आदरांत.
विश्वासाच्या सांगीवरुनी दूध मिळालें नामी.
दिसे 'बढैय्या' दूधपाक हें परमान्न रामधामीं.
ताज्या भाज्या कंदर्पाच्या चाले दर्प भजांचा !
विसर कधींही न पडायाचा ह्या आजच्या मजांचा !
आग्रह–कोलाहलांत झाली परिपूर्ण मेजवानी.
"प्रेमल देवी ! हवे तयारी करजो घेर जवानी !"
ह्या रावांच्या सुविनोदावरि ती उद्गरली–"सारूं !
पानबान तो खावा देशो ! के ते पण नहि वारू !"
मग रावांनीं सर्वांनाही दिधले पानविडे ते.
नोकर, चाकर, गाडीवाले दिसले प्रसन्न जे ते.
अवरासावर झाल्यानंतर करुनि सुरक्षित 'धाम'.
सर्व मंडळी परत निघाली घेवोनि रामराम. २७

## १२ प्रेमसमाधि हेंच लग्न !

ते रात्रींचे नऊ वाजतां आले परत घराला.
सर्व तृषेनें व्याकुळ होते. थंडा फराळ झाला.
मग दिवसाच्या इतिहासाची पुनरावृत्ति निघाली.
माजलपुरची पुनरपि माजे हास्य–विनोद–खुशाली.

एकंदरिनें हें वनभोजन छान यशस्वी झालें.
एकमतें त्या विवेचनाचें तात्पर्य हें निघालें.
सायासांचें सार्थक झालें; निपजोनि भावना ही.
सर्वांहि वदनीं प्रसन्नता ही नाचत, खेळत राही.
तंव रावांनीं नेत्रपल्लवी निज चतुरेला केली.
प्रेमकटाक्षें मृदु मुरका ती मारुनि घरांत गेली.
समजुनि उमजुनि आई उठल्या त्याही घरांत जाती.
मधुर गुर्जरी भावगीत हें राव मनाशीं गाती. *
प्रेमलदेवी जाणत होत्या त्यांतील नोक झोंक.
अजाणतेचा मार्ग तयांनीं पतकरिला बिनधोक!
त्या रावांना म्हणति—"खेळता ? मी तर असे तयार."
"थांब जरा, मी येतों;"—म्हणुनि झाले राव पसार!
सज्जन-सिंहचि! सावज मग तें टक लावोनि पहाती.
धवल विजेची निवळ चंद्रिका झळकत असे अहा ती!
बंगल्यामधुनी प्रशांत ऐसे एकान्तराज्य चाले.
कृष्ण निशेच्या आवरणानें अंतर्मुख मन झालें.
प्रेमलदेवी हीच एकली ज्योती दिसे तयाला.
चिद्रुपासम तद्रूपांतचि सज्जन विलीन झाला.
तो अपणांला विसरुनि गेला होवोनि एकतान.
प्रेमसमाधी जडला! झालें शुभ लग्न सावधान!
राव सकाळीं जागृत करिती त्यास पलंगावरती.
हंसत म्हणाले—"अझुनि नसे कां झोंप जहाली पुरती ?"
तों मुखमार्जन करावयाला प्रमिला आणी पाणी.
"तयार आहे चहा," म्हणे ती किस्मत्पुरची राणी! १४

* "केम तमे शाम मारा! आवता नथी ?"
आवता नथी,— मों बतावता नथी! केम तमे इ० "

१३ मित्रचंद्रोदय

मग मुखमार्जन उरकुनियां ते माजघरामधिं आले.
गृहिणीसन्मुख चहा पितांना सज्जनसिंग म्हणाले:—
"तुमची संमति असली तर मी घरास जाउनि येतों.
तिकडे माझा जम जमल्यावरि येथूनि यांस नेतों."
राव म्हणाले—"मी उभयांना सुंदर वस्त्रें घेतों.
निजेष्टमित्रांसह सर्वांना पंक्तीभोजन देतों.

नंतर छायाचित्रहि घेतों नामी वधू-वरांचें.
नोंदवहींतुनि टिपण ठेवितों मी ह्या स्वयंवराचें.

उभयांसहि जें द्यायाचें, तें देवोनि आदरीन.
नंतर सज्जनसिंग तुम्हांला मी मोकळे करीन !

तोंवरि आपण हें घर अपुलें मानुनि इथें रहावें.
हा मथिताशय कळवुनि दुर्लभ-सिंगांस बोलवावें."

हें ऐकुनि ते थिजले ! गृहिणी-मुखचंद्रमा पहाती.
लांबविलें निज गृहागमन ! हें जाणुनि खिन्न रहाती.

त्यांचें मानस जाणुनि वदले नंतर राव पुन्हां तेः—
"व्यर्थ म्हणुनि मी क्षणभरही नच ठेवीन आपुणांतें."

मग ते उठले. निज मित्राला लिहिलें पत्र तयांनीं.
तदागमन-दिन वेळहि त्याला विचारिला विनयानीं.

निज कार्यक्रम रावांनीं जो आंखोनि ठेवियेला,
तदन्वयें मग तेही झटती सन्मान--सत्क्रियेला.

यायोगें त्या नवयुग्माला संयोगयोग आला.
तत् प्रेमाच्या अभिवृद्धीचा सुमधुर लाभ मिळाला.

पाकोळीसम घिरट्या घाली ती सज्जनासभोंतीं !
चकोरसा तो बघतच राही वासंत चंद्रिका ती !

नित्य तयांनीं खावें, प्यावें, बागेंतुनि विहरावें;
प्रिय सखिचा दिल्रुबा ऐकुनी हास्य-विनोद करावे.
ही दिनचर्या करितां त्यांना दुर्लभ-लिखित मिळालें.
मित्रचंद्रही आला ! भरतें मनोदधीसहि आलें ! १४

## १४ वसाहतीच्या प्रगतीचें निवेदन

स्वागत होउनि मित्र जिवाचे त्या बंगल्यामधिं आले;
बसले. दुर्लभसिंग विलोकुनि वैभव गारचि झाले !
श्रमपरिहाराकरितां प्रमिला रुचिकर चहाहि आणी.
राव म्हणति—" ही प्रेमलदेवी,–किस्मत् पुरची राणी ! "
तों प्रमिलेनें ठेवुनि पेले, केलें नमन तयांना.
दीर्घायू व्हा ! उभय सुखी व्हा ! ते वदले वरदानां.
त्या चित्रातें पाहुनि त्यांची दृष्टी चकितचि झाली !
उद्गरती ते—" असति खरोखर दोघेहि भाग्यशाली !
यांना साजे असा निवासहि झाला असे तयार.
रंगवुनी तो सज्जहि करितां; होईल झोंकदार !
किस्मत् पुरच्या वसाहतीला जे लाभले पुढारी,
केवळ सात्विक असति ऋषी ते शिल्पांतिल अधिकारी.
अल्पावधिंतचि वसाहतीला त्यांनीं दिले निवासी.
सुजन शेलके राहति तेथें बांधोनि ते घरांसी.
ऋषिवर्यांनीं सर्व गृहें हीं सम-नमुन्याचीं केलीं.
आजमितीला त्यांची संख्या पंचविसावरि गेली.
ऋषिवर्यांचा आश्रम, हा तर फारच सुंदर झाला !
तेथें जाउनि वसतां होतो परमानंद जिवाला.
मातामंदिर, शिवमंदिरही सभागृहासह झालें.
ठेवुनि टाकी घटयंत्रानें विपुल नळोदक आलें !
गदळ जळाचा निकाल दिधला काढुनि बंधामाजीं;
त्या पाण्यानें गुरें चराया हिरवळ होते ताजी.

झाडुनि ठेविति मलापकर्षक निर्मळ वसाहतीतें.
किस्मत्पुर हें आरोग्याचें गमतें निधान की तें !
आकर्षुनियां सुखलोलुप जन अझुनहि कितेक येती.
ऋषिवर त्यांना निज नमुन्याचीं सदनें बांधुनि देती.
पांच अकिंचन धंदेवाले जाणुनि कुशल तयांनीं
वसवियले तल्लाभ मिळाया कर्जाऊ रकमांनीं.
शेतामधुनी तुरी, बाजरी, कापूस, तीळ पिकला.
शेतकऱ्यांच्या करवीं काढुनि मी तो मालहि विकला.
भूमी छानच असे. तियेचा कस वाढवावयाचा;
आणि बगीचा पुष्प–फलांचा तिजवरि करावयाचा.
सज्जनसिंग जहाले असती आतां शिकुनि तयार.
येउनियां ते लवकर तेथें करितील ही बहार."
राव म्हणाले––"ह्या लग्नाच्या देवोनि मानपाना,
किस्मत्पुरला मी उभयांना करितों त्वरित रवाना."
स्वादु चहासह मुखशुद्धीसह हें संभाषण झालें.
घेउनि त्यांचा निरोप रावहि निज कार्यास निघाले.
मग एकान्तीं मित्र जिवाचे हितगुज करिती कांहीं.
दिसलीं वदनें हंसरीं. पण तें खल्बत कळलें नाहीं !

## १५ (अ) लग्नसोहळा

त्या प्रेमांकित नवयुग्माचे पोषाक भव्य झाले.
हारालंकृत कंठालिंगन होउनि चित्र निघालें.
ध्वनियंत्राच्या संगीतांतुनि होवोनि मेजवानी;
ती श्रीमंती पानसुपारी केली मग रावांनीं.
नागरिकांच्या लग्नवहींतुनि परिणय नमूद झाला.
"प्रेमलदेवी" नावें हुंडा–ऐवज जमेसि आला.
दुर्लभ ऐशा मित्रवराला शिरपाव राव देती;
"संभाळा ही भगिनी" म्हणतां डोळे भरोनि येती !

दुर्लभ वदला--" आपण कांहीं आणूं नका मनाला
रजपूतांचें ब्रीद असे हें ठाऊक आपणांला.
माझ्या सज्जन-देहांतिल ही ज्योती प्रेमलदेवी,
आम्ही दुसरा जीवच मानुनि जतन करूं ही ठेवी.
प्रमिलेविषयीं आपण अगदीं निश्चिंतसें रहावें.
फार कशाला ! मी म्हणतों हें अनुभवुनीच पहावें."

## (ब) विरहाचें विरजण

यापरि संपुनि लग्नसोहळा दुसरे दिनीं दुपारीं
त्या मित्रांच्या रवानगीची चाले आज तयारी.
डोकावुनि जो पहातसे तो आला विरह समोर.
प्रेमलदेवी दिसे धुक्यांतिल ती खिन्न चंद्रकोर.
हास्यमुखींचे मावळलें ! तो उल्हास आज गेला !
आश्चर्यच कीं, वसंत असतां ये मौन कोकिळेला !
येतां जातां मलूल नलिनी मुखचंद्रमा पतीचा,
बघतां डोळे भरोनि येती, थरके अधर सतीचा.
भूगर्भांतिल झऱ्यांपरी ते उद्वेग भावनांचे,
हृदयामधुनी उचंबळोनी बघती प्रांत मनाचे.
भावी वादळ जाणुनि संध्या जणु रजनींत निमाली.
सज्जन--मेघाडंबर येतां प्रमिलाहि वीज झाली.
प्रेमावेशें कंठालिंगन देवोनियां तयातें.
कारुण्यांकित साश्रुलोचना ती निरखिते प्रियातें.
"आतां केव्हां याल !" एवढें सद्गद रवें वदोनी,
हृदयीं झुकली. तिला निसासे हुंदके येति मधोनी. १५

## १६ (अ) प्रियेचें सांत्वन

"काय बरें हें ! शोहोणी ना तूं ! सांग मला, कीं वेडी !"
"वेडी ! वेडी ! खचित इकडच्यासाठीं अगदीं वेडी !"

अश्रु पुसोनी, कुरवाळुनि मुख, घेवोनि साखरेचे,
सज्जनसिंगें सांत्वन केलें त्या वशिनी चतुरेचें.
" मी का आज लढाईवरती कीं परदेशीं जातों ?
जवळच आहे, हवा तेथवां येतों कीं न पहा तो.
सांगितलें ना जम जमल्यावरि नेईन लाडकीतें.
रोख्यासम हें मान वचन तूं दगडावरील कीं तें.
आजचि नेतां तिथें प्रिये ! तूं आयास पावशील.
जीव सुखाचा दुःखीं न्यावा हें नहि माझें शील !
सुंदर बंगला, बागबगीचा, सुखसाधनेंहि झालीं,
म्हणजे नेउनि उपवन--धामीं पाहिन तुला रिझाली.
तोंवरि येथें रावांजवळीं आनंदांत रहावें.
मी म्हणतों हें आवडतें ना ! करुनि विचार पहावें."
"होइल तितकें लवकर येउनि मजलाहि न्यावयाचें.
आपुल्यावांचुनि खचित गडे मज नाहीं करमायाचें ! "
हें वदतांना सुलोचने तीं अर्ध निमीलित झालीं.
काया, वाचा आणि मनें ती त्या प्रियजनीं निमाली.

## नायकाचें प्रयाण

(ब) दुसरें दिवशीं स्नानें, भोजन उरकुनि निरोप घेती;
मित्र निघाले. प्रमिला नयनीं ते प्रेमपूर येती.
जाणुनि तीचें उघड मनोगत दुर्लभ तिला म्हणाला:—
" आम्ही किस्मत्पुरास नेऊं लवकरच आपणांला.
आपण चिंता सोडुनि येथें अगदीं स्वस्थ रहावें.
आम्हीं करितों काय पुढें तें शांतपणेंच पहावें."
त्या मित्रांना गाडीमध्यें बसवोनि राव आले.
आज सुचेना किमपि रुचेना, सर्वेहि उदास झाले.
प्रेममधू, जें संयोगामधिं लागे सुधेसमान,
तेंच वियोगें रवरवतें, कटु होतेंहि भासमान. १४

## १७ पुढचा कार्यक्रम

विश्रामाहुनि रथमालेनें केलें पुढें प्रयाण.
वरच्या वर्गी हेच उतारू होते विराजमान.
दुर्लभ वदला,--" निज धनकोची सव्याज फेड झाली.
किस्मत्पुरची मत्ता आतां निज मालकीत आली.
ठेवीमधली आज निमेशीं रकम असे शिलकेला.
ती ह्या कामीं लावायाचा आहे विचार केला:—
रंगवुनी मी निवास तूझा सज्जहि करोनि देतों.
संसाराचा मांडहि मांडुनि देतों तुला, वदे तो.
कलमें घ्याया रकम हवी तर तुजला देइन कांहीं.
बाग करुनि तूं पुष्प--फलांचे त्यांचा अनुभव पाहीं.
निज मातेची आणि शिवाची संस्थापना करोनी,
त्यांचे उत्सव; पूजाअर्चा, निभाविन तयां स्मरोनी.
ह्यानंतर जो ठेवींपैकीं ऐवज उरेल बाकी,
त्यानें माझा हिशोब चुकवुनि तूं हो धनी स्वतां कीं.
सारा जाउनि, योगक्षेमहि होऊनि जें उरेल,
त्या उत्पन्नें बागबगीचा, शेत--मळा सुधरेल.
सार्वजनिक निधि वसाहतीच्या सुधारणेस उभारूं.
त्याच्या व्याजें तत्रनिवासी--जनहित आपण सारूं.
मालक होतां तूं वहिनींसह तेथें सुखें वसावें.
पोक्तपणाचें हें मज दिसतें. तें तुज रुचुनि ठसावें."
" दुर्लभ ! तूं मम मित्र जिवाचा. तव हृदयाचे बोल
रुचले, ठसले, खरे हिताचे असती ते बहुमोल !
आजवरी तव हितोपदेशें चलतों आणि चलेन.
ह्या सुपथांतुनि उच्छृंखल मी होउनि कधिं न चळेन.

मात्र विनंती एकच आहे. इकडे जें जें घडलें,
त्याचा गंधहि तेथ न यावा; आला तर मग अडलें !"
" त्याची चिंता नकोच आतां ! होउनि रहा निराळा.
तळहातानें सूर्य कधीं का झांकत असतो बाळा ! " १४

## १८ नायकाचें गृहागमन

गाडी परिचित टापूमध्यें येतांच ह्या द्वयांचे
जागोजागीं भेटत बोलत ते मित्र परिचयाचे.
जणु मुंग्यांचा गोतवळा तो निज कार्यांत रहाटे,
बंधुप्रेमें येतां जातां अन्योन्यांसी भेटे.
वरच्या वर्गी यांस बघोनी करिती नवलचि सारे,
सज्जन याची कळुनि हुशारी वदतात वाहवा रे !
ते मौजेमधिं खातां पीतां गौरव ऐकत आले.
गाडीमधुनी उतरूनि दोघे तडक घरास निघाले.
" सन्मानाचें हें गाठोडें तुझिया इथें असूं दे ! "
सज्जन वदला—" गेलो तैसा आलों असें दिसूं दे."
करुनि तसें तो बहुता दिवशीं घरास आला आजीं.
त्यास गुडाखू पितां, पिता तो दिसला पडवीमाजीं.
जालनसिंगें त्यास खुषीनें दिधलाहि आवकार*
सूरजबातें नमुनि पित्यातें दिसला प्रसन्न फार.
काढुनि त्यानें प्रमाणपत्रहि दावियलें वडिलांसी.
तें पाहोनी जालनसिंगें त्यास दिली शाबासी.
" काय काय तूं तेथ शिकोनी आलास ! " तो विचारी.
स्वशिक्षणाची स्वरूपरेखा त्यानें कथिली सारी.
त्या संस्थेंतिल दिनचर्या तो इत्थंभूत निवेदी.
निज विजयानें उत्कर्षानें सापत्नभाव भेदी !

* हा स्वागतवाचक गुजराती शब्द चांगला जाणून येथें घेतला आहे.

खिचडी, भाजी, दूध, परोटे, सूरज वाढुनि आणी.
बातामाता करितां भोजन केलें तात-सुतानीं.

मेवासांतिल इष्ट, मित्र, जन, ह्यांच्या इतिहासाचें
जालनसिंगें मग पारायण केलें गत दिवसांचें.

गैर हजेरीमधिल हकीकत ऐकुनियां तो रिझला.
सहज खटोलीवरतीं पडतां डोळा लागुनि निजला.

तातानें तत्कौतुक केलें सूरजला न रुचे तें !
पडला तेथें पडला, त्याचा भाव न मुळीं पुसे ते.

तोही बापूंजवळीं बसला, वदला तिशीं न कांहीं.
मोतीं फुटलें, मन विटलें, तें पुनरपि सांधत नाहीं ! १५

## १९ किस्मत्पूरचें निरीक्षण

दुसरे दिवशीं मित्र मिळोनी किस्मत्पुरास गेले.
सज्जनमन त्या वसाहतीनें अतीव हर्षित केलें !

स्वग्रामधला महाल त्याला डोळ्यासमोर दिसला.
तो पोटांतुनि उकळी येउनि "ओ—हो !" म्हणोनि हंसला !

झांप्यावरती नाइक यांनीं स्वागत, सलाम केले.
फाटक उघडुनि देतां हंसले, यजमान आंत गेले.

ऋषिवर्यांचा प्रथम पाहिला 'स्वानंदवास' त्यांहीं.
तेही होते. सज्जन त्यांच्या चरणीं मस्तक वाही.

त्यांनीं त्याला उचलुनि धरिलें. क्षेमालिंगन झालें.
पाठ तयाची थोपटुनीयां "शाबास !" ते म्हणाले.

ऋषिवर्यांचा विस्मय पाहुनि दुर्लभ तर्कुनि गेला.
यांनां सारें कळलें ! जाणुनि त्यानें प्रश्नहि केला.

हंसले, म्हणति—"सयाजी–विजयावरुनि हकीकत कळली !
नवयुग्मांचीं चित्रें, चरितें, त्यांतुनि मज आढळलीं.

यांचे बापू विजय न बघती; त्यांना माहित काय !
कळतां म्हणतिल तूं सवता हो ! याला हाच उपाय !
ते म्हणण्याचा उशीर ! आहे येथें सर्व तयारी !
यांचें मालक ! महाल अपुला पहा वसाहत सारी."
ऋषिवर्योचा विनोद ऐकुनि पिकला हंशाच तेथें.
मित्र वसाहत पहावयाला उठले ऋषींसवें ते.
जननीनामें उभारिलेल्या निज ' सरदार–गृहा ' ते
सज्जनसिंग अगोदर झाले प्रेमादरें पहाते.

साधा तरि हा सुंदर बंगला असे उभाळ्यावरती;
बघुनि ऋषींच्या शिल्पकलेचें ते नवल फार करिती.

उंच दुमजली, वरी अगाशी, ती सुबक चंद्रशाला;
सुंदर सज्जे, दारें, खिडक्या, त्या तावदान–माला;
चंद्रगृहाच्या भिंतीमाजीं कालनिदर्शक साजे;
वसाहतीला दावुनि वेळा वाजे विशद अवाजें.

स्वागत-दालन, दिवाणखाना, खोल्याहि समसमान;
अंतर्गृह तें शेजघरासह, वस्त्रागार लहान;
स्नानागार, फवारा, नलिका, जिरण्याहि* पाकशाला,
धूमाच्या उद्वहनासाठीं चिमणी असे जियेला.
दिनचर्येला जरूर त्या त्या पाहोनि सर्व सोई,
किस्मतपुरचे मालक, यांना आनंद फार होई.
बंगल्यापुढतीं बागहि चाले; पुष्करणींत फवारा
होता; त्यास हजारा लावुनि नाचविल्या जलधारा !

---

* Sinks, ज्या मोऱ्यांचें पाणी बाहेर वाहून न जातां, आंतल्या आंत जिरतें अशा मोऱ्या. हा शब्द ' जिरणें ' ह्या क्रियापदावरून नवीन नाणा-चला आहे. मोल्स्वर्थमध्यें ' जिरणी ' असाही एक शब्द आहे. त्याचे अर्थ पहा.

त्या बिंदूंचीं जणु भावंडें सज्जन-नयनीं येती;
स्वग्रामधल्या देखाव्याचें कौतुक पाहुनि घेती !
वसतीमधल्या रुंद पथांवरि त्या सुखनिवास-माला,
अद्यावधिच्या त्यांतिल सोई सुखविति नव तरुणाला.
तंव ऋषि म्हणती,—डाक-तारघर उरलें करावयाचें;
सर्व वसाहत भरल्यावरती करिन विचार तयांचे.
सुंदर चिमकें कालीचें तें मंदिर सुरेश्वराचें,
पत्रे-निर्मित सुसभामंडप—कार्यालयच पुराचें—
पाहुनि तेथें विसांवतां, ते ग्रामनिवासी आले;
ऋषिवर्यांच्या निवेदनानें त्यांचे परिचय झाले.
मालक त्यांना पुसति खुशाली. झाली तिथेंच चर्चा—
श्रावणमासीं त्या देवाच्या निश्चित झाल्या अर्चा.
नंतर रचना घटयंत्राची पाहुनि विहीर, टाकी,
ते गदळाचा निकाल बघती जाउनि बंध-तटाकीं.
परतुनि आले सर्व ऋषींच्या ते रम्य आश्रमाला.
त्यांस गौतमी चहाहि देती, नेती परिश्रमांला. २१

## २० वधू-प्रवेशाचा बेत

ऋषिवर वदले—" प्रेमलदेवी यांना घेउनि यावें.
रंगवुनी हा निवास देतों; आपण सुखें वसावें.
गृह सजवाया निजावडीच्या वस्तू तेथुनि आणा.
अपुला शालक वर्गमित्र हा आहे चतुर शहाणा.
तो त्या मिळवुनि देइल नामी, जपुनि करील रवाना;
सतरंजांचीं मापें देतों तैशा सुरेख आणा.
संसाराचा मांड मांडुनी दुर्लभ ठेविल येथें.
किस्मत्पुरच्या राणींचीही स्वारी तोंवरि येते !"

सज्जन वदला–" पुष्पफलांचे बाग करूं या आधीं.
त्या कामीं ह्या घरधंद्याची होइल मला उपाधी.
त्यासाठीं मी जमीन आधीं करुनि तयार पहातों.
बडोद्यास मग बालतरू ते आणावयास जातों."
तंव ऋषि वदती,–" आपुल्या गृहिणी दिसती फार हुशार.
त्या घरकामीं साह्य कराया असती आज तयार.
सजवुनि देतिल कलावती त्या अपुला निवास नामी.
त्या असतांना उलट उपाधी ? ही तों सबब रिकामी !
ही सामग्री घेउनि येतां, त्यांस बरोबर आणा.
या वासंतिक मधुर हवेचा त्यांस करा नजराणा.
अर्चेसमयीं प्रेमलदेवी यांची जरूर असते.
बरसातीमधिं त्यांचें येणें सोईवार न दिसतें.
बालतरूंच्या हुंडया येतां, विहिरीभंवत्या ठेवूं.
त्यांस मृगाच्या वाफेमधुनी नंतर रोपुनि देवूं."
ऋषिवर्यांची सुमधुर सल्ला सत्य सुपथ्यहि होती.
सज्जन ह्याच्या गळीं उतरली; सरबततुल्य अहो ती !
हंसत म्हणे तो–" बरें बरें तर; आम्हीं तसेंच करितों ! "
मित्र निघाले; प्रणमुनि सोमा, झांपा उघडुनि धरितो. १२

## २१ कर्तव्याची पूर्वतयारी

बागांसाठीं त्या जमिनीला असति हितावह ऐसे
सज्जनसिंगें राब, खतादिक केले उपाय खासे.
कुळवुनि नामी समांतरानें करुनि अळ्यांच्या हारी,
रोपायास्तव बालतरू ते केली पूर्व तयारी.
ऋषिवर्यांनीं गोरोचनसा पिंगट वर्ण सफेता
सदभिरुचीचा तैलरंग तो दिधला निळा सभोंता.

त्यायोगें तें अन्वर्थकसें ‘ सरदारगृह ’ विराजे.
पाहुनि त्यातें नवलन्हि केलें तेथिल रसिक समाजें.
तंव रांधणघर सज्ज जहालें हरएक साधनानें.
कोठारांतुनि वस्तुपूर्ण तीं खुलतात बारदानें.
यापरि दुर्लभसिंगाकडुनी सर्व तयारी झाली;
ऋषिवर्यांच्या हातीं किल्ली त्या बंगल्याची आली.
“ येइल माझें लिखित अगाऊ त्या अन्वयें करावें.
विश्रामावरि वाहनसंख्या घेउनि तुवांहि यावें.”
यापरि सांगुनि निज मित्रातें सज्जनसिंग पित्याला
वदला—“ बापू ! आज पुन्हां मी जातों वटोदराला.
बाग कराया इथें हवीं तीं रोपें घेउनि येतों.”
ऐसें सांगुनि नमुनि तयातें सज्जनसिंग निघे तो.

## २२ वस्तु–संग्रह

प्रेमलदेवी–हृदयमंदिरीं वासंत चंद्र आला !
तों प्रेमाच्या महोदधीला रत्नाकरच मिळाला.
तुंग तरंगहि ते हेलावे त्याचे काय पुसावे !
आनंदाच्या भाग्यघोषें तें गृह नादित व्हावें.
सज्जनसिंगें विश्वासाच्या केली रकम हवालीं.
मृदु संवादें गृहवस्तूंची यादी निश्चित झाली.
मग त्या वस्तू सज्जन–रावें मिळुनि खरेदी केल्या.
प्रेषित व्हाया योग्य निगेनें त्या सर्व बांधियेल्या.
मिस्त्री यांच्या सर्व चिजांची सुपूर्द मुक्कामाला
ठरली होती. तदन्वयें ते लागति निज कामाला.
हें आटोपुनि वर्गगुरूंना ते भेटाया गेले.
नमुनि तयांना त्या शिष्यांनीं मानस निवेदियेलें.
तें परिसोनी कौतुक करिती, उत्तेजनास देती;
आगत्यानें बालतरूंच्या गृहीं तयांसह येती.

त्यांनीं कलमी आंबे, तैसे नानाजाति सु-निंब,
अंजीर, चिकू, जांबहि दिधले नामांकित दाडिंब.
बहु जातींचे गुलाब, मुद्गर, चंपक, आणि चमेली,
कुंद, जुईचीं, नेवाळीचीं रोपें पसंत केलीं.
गुरु ह्मणती—" हीं सारीं रोपें ठेवा करुनि निराळीं;
लारीमधुनी विश्रामावरि घेऊनि जा सकाळीं.
अमुक वाघिणी* मधुनि जपोनी तीं मुक्कामीं न्यावीं.
संगें माळी ठेवुनि त्यानें त्यांची निगा करावी."
" आपण म्हणतां तसेंच करितों."—शिष्य तयांते म्हणती.
हिशेबनीसापुढें तयांची नगदी किंमत गणती.
दोचाकीवरि परतुनि आले ते मेहुणे घराला.
प्रेमलदेवी यांनीं दिधला स्वादु चहा उभयांला. ११

## २३ (अ) नवयुग्माचा विनोद

पानें चावित जिवलग मग ते एकांतात रिघाले.
प्रेमलदेवी यांस विनोदें सज्जनसिंग म्हणाले—
" कां राणीजी ! अपुली तबियत खूष असे ना आतां !
कसे कसे पण गुलाब फुलले ! आनंद हो पहातां.
ते भ्रमरींचे सुसकारेही ऐकूं आज न येती.
नहि ओघळती दंवबिंदूसम त्यांवरुनि आंसवें तीं.
ओ हो !—पडला हारच माझ्या गळ्यामध्यें हा भासे !"
प्रेमलदेवी प्रेमकटाक्षें मुरका मारुनि हांसे.
" पुरे गडे ! तो वियोग आतां ह्या योगांत कशाला ! "
असें म्हणोनी प्राशितसे ती प्रेमाचिया नशाला.

---

* Waggons; ज्यांच्यावर आच्छादन असून चारी बाजूंस गोण-पाटांचे पडदे असतात, अशा वाघिणी.

"आठवतें कां लवकरि तुजला नेइन म्हणुनि म्हणालों!
तयाप्रमाणें किस्मत्पुरला मी न्यावयास आलों.
"चलायचें ना!"–हंसत वदे ती "माझी असें तयारी!"
त्यानें तेथिल मौज तियेला सांगितली मग सारी.
एक तुला मी गुज कथितों, तें ध्यानीं खास असावें.
गेहीं प्रमिला, प्रेमलदेवी लोकीं तुला दिसावें.
गुर्जर भांती उद्याच देतों पोषाक राजसेला."
कट्यारसा तंव वामकटाक्षच सज्जन हृदयीं गेला!
"रजपूतांची शोभसि आतां प्यारी खरी कट्यार!
प्राणांची तूं धनीण माझी दे मज दे तो प्यार!
व्रण बुजुनी तो ताजा झाला. संजीविनीच प्याला!
प्रेम असे हा अजब गुणांचा केवळ 'एकच प्याला!'
"पण तुज करितां येइल ना गे पेहेराव सांग कीं तो!"
"होय, आम्ही तो शाळेमाजीं जातां करितच होतों."

## (आ) जोडप्याचें प्रयाण

आतां केव्हां घरास जाऊं झालें असें तियेला.
रावां करवीं तिनें निकटचा सुमुहूर्त काढियेला.
शुभ दिन निश्चित होतां दुर्लभसिंगास पत्र गेलें.
लारी करुनी बालतरू ते विश्रामावरि नेले.
ठरवुनि माळी कुशल तयाला ते सोंपिले तयांनीं;
भोजन उरकुनि सर्व निघाले मग ते सवेग यानीं.
प्रमिलेसंगें सध्यां तेथें मदतीस पाठवावे
रांधपिणीला, राघूलाही हरकामास्तव न्यावें.
यापरि ठरतां तीं दोघेंही त्यांच्या सवें निघालीं.
विश्रामावरि समयापूर्वीं सर्वहि दाखल झालीं.

तव हुंड्यांच्या दोन वाघिणी होत्या तयार न्यार्या.
सर्वजणांचें देउनि भाडें सजले रावहि जाया.
रथमालाही आली; खासे वरच्या वर्गी बसले.
आई, सुमती यांचें भरतें आज अनावर दिसलें.
प्रमिला म्हणते—" आई ! वहिनी ! कां दुःख करितसां हें !
सांगा मजला किति वरसें मी तुमच्या जवळच आहे.
आतां मी मम गृहीं असावें हें नांवलौकिकाला
योग्य असोनी हितकर आहे अपुल्या उभय कुलांला.
आणि तशी मी दूरहि नाहीं येइन जाइन येथें.
रावांजवळीं आनंदानें रहा. बरें मी येतें !
वहिनी ! आतां तुम्हीच इजला व्हा माझिया ठिकाणीं.
लोभ असूं द्या. पत्रें धाडा. नांदा घरीं सुखांनीं."
राव म्हणाले—" ताईचें घर पाहुनि लवकर येतों.
सांभाळोनी रहा. आतां जा, झाली वेळ." वदे तो.
तंव रथमाला शीळ घालुनी उच्छ्वासांत निघाली.
वारीमधुनी साश्रुलोचना प्रमिला डब्यांत आली.
विश्रामावरि ऋषिवर, दुर्लभ, येवोनि त्यांस घेती.
सुखकर वहनामधुनि सर्व ते किस्मत्पुरास येती. २६

## २४ सरदारगृही आगमन

सरदारगृहीं वसाहतींतहि आनंद आज झाला.
तें सुमनोहर दृश्य बघोनी प्रत्येक जन रिझाला.
अपुले मालक पहावयाला सर्व निवासी येती.
ऋषिवर त्यांना मालकिणीची ओळख करोनि देती.
देशाचारें नवयुग्माला कुणि *'चांदले'हि केले.
कुशल विचारुनि भेटुनि बोलुनि मग ते घरांस गेले.

---

* आहेरवजा रोकड रक्कम देणें यास 'चांदला' म्हणतात.



सरदारगृहीं आगमन

विश्रामाहुनि तंव गृहवस्तू कलमेंहि सर्व आलीं.
त्यांस निगेनें ठेवुनि माळी अभिषिंचनही घाली.
तंव मित्रींचा मनुष्य वस्तू अव्यंग सर्व सोपी.
चुकवुनि किंमत राव पावती देउनि तया निरोपी.
सोमाकरवीं शेतकऱ्यांतचि माळ्यास वास देती.
ऋषिवर यांच्याकडे चहाला मग सर्व आज येती.
गप्पा गोष्टी, हंशा, खुशाली, रुचिकर पानहि चाले.
टापटिपीचा आश्रम पाहुनि ते जन मनीं निवाले.
प्रेमलदेवी यांचें कौतुक करितात गौतमी त्या.
त्याहि ह्मणाल्या–"येथें अमुच्या आईच हो तुम्ही त्या !"
तंव ऋषिपत्नी म्हणति ऋषींना, " जोडा छानच आहे !
शतंजीव व्हा ! सुखांत नांदा ! गांग मुखांतुनि वाहे."
मग मुखशुद्धी घेउनि मंडळ परत 'गृहा' तें आलें.
नाइक येउनि मुजरे करिती. त्यांचे परिचय झाले.
एक निवासी सधन उदीमी आणुनि दिवे घुराचे
नवागतांना भासवि सुख त्या अभिनव वटोदराचें.
रांधपिणीनें ताजी भाजी, खिचडी तयार केली.
साध्या अन्नें पक्कान्नाच्या तोडांत मारियेली !
वरि विहिरिचें प्राशन करितां तें थंडगार पाणी,
अमृतानुभवच तयां कळे, जो नुमजे ग्रंथ–पुराणीं !
मग गृहवस्तू-नियोजनाची वाटाघाट निघाली.
"आपण दोघे मिळुनि करूं हें," भगिनी तदा म्हणाली.
गोशामधुनी तेवत होते, न हि दीप आज विझले;
हवा--महालीं मंजुळ झुळुकी सेवीत सर्व निजले. १६

## २५ (अ) वळवाचा पाऊस

दुसरे दिवशीं स्वागत सदनीं ऋषिवर यांजसवें ती
सर्व मंडळी हास्यविनोदें रुचिकर चहास घेती.

प्रेमलदेवी राव मिळोनी मग ते क्रमाक्रमानें
शृंगारुनि गृह खुलवुनि देती नूतन रुचीप्रमाणें.
तंव झंझानिल अवचित वाहे, आले थवे घनांचे.
निदाघकालीं वादळ झालें कल्याणकृत्तिकांचे.
आकाशांतुनि लख्ख उजेडुनि थैमान चंचलांचें
कडकड शद्बें वज्रनिपातहि होती अतुल बलांचे.
रणदुंदुभिसम संतत चाले घनघोर गर्जना ती;
दिगंतावधी ध्वनिलहरी त्या फैलावुनी वहाती.
करवंदासम थेंब टपोरे, आल्या सळसळ धारा;
धारांमधुनी गोफणगोटे ऐशा वरसति गारा.
काहूरच तें ! झोड उडाली अनिवार पावसाची;
ताप निवाला. सुकाळ-चिन्हें दिसलींहि भरंवशाचीं
तासभरी हें वादळ होउनि नंतर शांत जहालें;
वनलक्ष्मीला पाचेपरि तें नव लावण्यचि आलें.
तिसरे प्रहरानंतर खुललें. तेजोनिधी प्रकाशे.
त्या तेजांतुनि चमकुनि गळती मोतीं यथावकाशें.

## (ब) कुंजवनाची तयारी

तंव रावांना मालक वदले-"उद्यां मळयामधिं जाऊं;
आपण माळी धरुनि करारीं कलमें लावुनि देऊं"
आरंभुनि मग हळूहळू तें केलें कार्य तयांनीं;
कुंजवनाची पूर्व-तयारी झाली एकमतानीं.
बंगल्यापुढतीं वेल मोगरे, करवीर, पारिजात,
असति गबानें गुलाबही ते लावियले बहुजात.
त्यांतचि कलमी आंबे, दाडिम, तीं निंब चंपकांचीं
रोपें आलीं कुंद, चमेली, निर्माळिचीं जुईचीं.
त्यायोगें तो बागहि बंधू शोभे कुंज-वनाचा;
आरामच कीं प्रेमलदेवी हीच्या शुभाननाचा ?

हीं मदतीचीं कामें सारुनि शालक विचारितात–
"आम्हीं जावें ?" मालक वदले, "आपण पुसा घरांत."
प्रमिला म्हणते–"आल्यासरसे दिन चार सा रहा ना."
"तुझें जहालें ! तुला काय ? मज कामें असतिं पहाना !
त्यांतुनि कोणी घरींहि नाहीं; बघतील वाट आई;
म्हणुनिच म्हणतों, यावेळीं तूं जाऊं दे मज ताई."

## (क) मेहुण्याची रवानगी

मग रावांना दुसरे दिवशीं देवोनि मेजवानी,
रवानगीची त्वरित तयारी केली त्या उभयांनीं.
श्रावणमासीं अर्चेसमयीं सर्वांस यावयाला
सज्जनसिंगें आग्रह करुनी तो आणखी म्हणाला—
"आपण पावसकर बंधूंना आदेश शीघ्र द्यावे.
दोन मुखवटे त्यांजकडोनी चांदीचे करवावे.
मातेसाठीं, शिवजीसाठीं; ढोबळ मात्र नसावे.
मापें देतों, त्या बेताचे, नमुनेदार दिसावे !"
तदन्वयें मग करितां त्यांनीं रावहि निरोप घेती.
दुर्लभ–सज्जनसिंगांसह ते विश्रामावरि येती.
रथमालेची वेळच होती. ते बैसुनी निघाले.
अन्योन्यांचीं नमनें झालीं."पत्रें लिहा" म्हणाले. २१

## २६ प्रियाराधन

नंतर दुर्लभ घरास गेला. मालक वसाहतीतें
'गृहा'स येतां प्रेमलदेवी दिसली खिन्न सखी ते.
कुरवाळुनियां मग तिजला ते अंतर्गृहांत नेती.
मौना बसतां सुखासनावरि डोळे भरोनि येती.

" तूं हौशीनें आलिस ना गे ! मग खेद कां बरें हा !
तूं राणी ह्या वसाहतींची, शोभाहि तूंच गेहा.
पुरवायाला तुझे मनोरथ हा मी हाजर आहे.
मग देवीच्या जिवास व्हावे आयास कां वृथा हे ?
आतां राव हवे ? कीं व्हावा मी तुज ? सांग बरें तूं.
माया, प्रेमा, यांतील तरतम जाणसि ना चतुरे ! तूं !
तव खेदानें खिन्न सखे ! मी असतों सुखी सुखानें.
तरि जीवेश्वरि ! ममैक्य देवी ! सुखवी हसतमुखानें ! "
" इतुकें प्रवचन कशास व्हावें ? मी तर सुखांत आहे.
मम खेदाचें कारण नुमजुनि भलतीच कल्पना हे !
माहेराचें, बाळपणाचें, स्मरण मला तें झालें.
त्या सौख्याला अंचवलें मी जाणुनि ओघळ आले ! "
" अंतर्गृह हें प्रेमिले, तुझियें माहेर भरंवसावें.
बाहेरुनि तूं प्रेमलदेवी, प्रमिला आंत असावें.
माहेरीचा खेळगडी हा तुजला आठवतो ना !
तो असतांना खेद निरर्थक मग हा रुचेल कोणा !
ताकानें का तृषा दुधाची शमते ! मोह तुझा हा !
साखर ! साखर बनारसेची ! गोडी काय अहाहा ! "
चंद्रानन तें झांकुनि गेलें त्या प्रेम-मुद्रिकांनीं.
रुंजीरंजित अरविंदच तें हो मधुर गुंजनांनीं.
यापरि मधुकर गुंगुनियां तो मधुकोशांत निमाला.
स्वानंदाचा एक उमाळा गदगद असाच आला !
प्रात:कालीं प्रसन्न ऐसें तें वदनबिंब साजे.
घनाभिषेकें जणु भंवतींचें नंदनवनच विराजे ! १४

## १७ ( अ ) कार्यपुष्पांचें तोरण

आरंभींच्या चिन्हांवरुनी वर्ष सुखावह होतें.
मृगनक्षत्रापासुनि वर्षति मेघ उदारच हो ते !

किस्मत्पुरच्या शेतांमधुनी मग पेरणीहि झाली.
हर्षरोमसे अंकुर येउनि भूमी दिसे रिझाली.
पर्जन्यानें मधुनि उन्हानें वाढीस लागुनी ते
पानें, रोपे, विविध पिकानीं खुलुनि दिसे धरणी ते—
शेतांमधुनी तुरी, बाजरी, कापूस, तीळ यांची
आणि लावणी मळ्यांत केली भाज्या, फलादिकांची.
पालघराहुनि वर्ग-बंधुनें बहु जातिवंत केळी
पाठविल्या त्या येतां दिधल्या लावोनि ह्या सुवेळीं.
झिम झिम चाले, वात वहाती, पिंगा झुले पिकांचा;
पाचेपरि तो हिरवागारच सागर दिसे सुखाचा !
(आ) ओंकाराहुनि रेवातीरीं व्यापारी जन आला.
यात्रेकरितां घेऊनि संगें बाणहि विकावयाला.
ऋषिवर्यांसह उभय मित्र ते मेळा पहावयाते
गेले असतां अवचित दिसले तें बाण ते तयांतें.
एक सुचिन्हित बघुनि तयांतिल त्यांनीं पसंत केला.
सुरेश्वरचि तो; अमोल ! तरिही मोल समर्पुनि नेला.
ब्राह्मण तेथें सत्वशीलसा आकाशवृत्ति होता.
कर्मनिष्ठ; तो आश्रयदाता कोणी बघे सभोंता.
सात्विक वृत्ती बघुनि तयाची पूजकपदीं तयास
योजुनि, ऋषिवर शिवालयींचा देऊं करिति निवास.
निज पत्नीसह आनंदें तो येवोनि तेथ राही.
तेणें पूजा-नैवेद्यांची चिंता नुरे जराही.
(इ) शेतकऱ्यांनीं मजूर लावुनि निंदुनि शेत-मळा तो,
ऋद्धिपथांतिल करुनि दिलासे प्रतिबंध मोकळा तो.
त्यायोगानें बालतरू ते जोमांत पीक आलें.
तें पाहोनी सर्व निवासी-जननेत्र ते निवाले.
होतां होतां धार्मिक महिना ये यजनपूजनाचा.
प्रेमनिमंत्रित हृदय-जिव्हाळा आलाहि सज्जनाचा.

रावांसंगें इंराबाई, सुमती-सूनहि आली.
प्रमिलेचें गृहवैभव पाहुनि सारीं बहुत रिझालीं.
पावसकरकृत रम्य मुखोटे, पोशाक देवतांचे,
बघुनि निरीक्षक सर्वहि धाले; कीं ते रसिकमताचे.
ऋषिवर-अध्यक्षांच्या समुचित सात्त्विक नजरेखालीं
'सरदारगृहीं' आनंदाची जणु पर्वणीच आली !
स्वागत, रुचिकर चहा, परींचे उपहार, खानपानें,
बघुनि वनश्री, ते जन रमले सुविनोद-वादनानें.

(ई) श्रावणमासीं पूर्ण तिथीला गुरुपुष्य-योग होता.
अर्चासाठीं प्रशस्त दिन हा सांगे याज्ञिक होता.*
कालीमंदिर, सुरेश्वरालय, यांच्या सुमध्यभागीं
मंडप दिधला, अशोकपल्लव लावोनि जागजागीं.
वसाहतींतिल मिस्त्रीकरवीं तीं स्थंडिलेंहि दोन
करविति याज्ञिक दोन सु-वेदी त्या मंडपामधोन.
पल्लव, समिधा, हवनद्रव्यें, साहित्य पूजनाचें,
वस्त्राभरणें सिद्ध कराया देती टिपण तयांचें.
म्हणती आम्हीं अदल्या दिवशीं ब्राह्मण घेउनि येऊं.
नित्यविधीतें उरकुनि मग हें कार्यहि करोनि देऊं.

(उ) दुर्लभ ह्याच्या सुचनेवरुनी मग मानसिंग गेले.
ठाकोरांला, सूरजबांला, त्यांनीं निमंत्रियेलें.
म्हणती आम्ही उद्यां पहांटीं गाड्यांमधोनि जातों.
अमुच्यासंगें आपण येउनि उत्सव-मजा पहा तो.
मी उभयांना वाहुनि नेतों, सन्मानही करीन;
अवश्य यावें, मी अपुणांला आणोनि पोंचवीन.
बापू म्हणती,-" सज्जन कलमें आणावयास गेला,
त्याचा अझुनी थांग न लागे ! मी तो न पाहियेला !"

* हवनकर्मांतील एक अधिकारी.

" परतुनि आला. कामासाठीं वसाहतींतच राहे.
चिंता न करा. उद्यां दिसेलचि अगदी मजेंत आहे ! "
सांगति ऐसें मानसिंग, तंव चहा–कषायच आला !
तोंड भरोनि दिली सुपारी, हुक्का सतेज झाला !
स्वागत होउनि यापरि उठले मग मानसिंग जाया.
म्हणति–" असावें तयार; येइन अरुणोदयींच घ्याया. "

(ऊ) मेघाच्छादित गगन असोनी पाऊस आज नव्हता,
उषःप्रभेंतुनि भासतसे हा तंद्रेंत लोक भंवता.
कुठुनि तरी ती कुहूकुहू ये सहसाच कोकिलांची;
तंव शकटाची खटखट चाले, घणघणहि घंटिकांची.
ह्या शकटावरि परिचित दिसला दुर्लभच सारथी तो.
पति 'चतुरे' चा वसाहतीला ने रथ निकट पथीं तो.
त्याजमधोनी मानसिंग ते जालनसिंगहि होते;
दुर्लभपत्नी, साकरबाही सूरज असे अहो ते !
रविमंडळही तें मंडळही किस्मत्पुरास आलें.
तेथिल सारा थाट बघोनी गारेगारच झालें ! ३६

## २८ उत्सवाचें वर्णन

सरदारगृहीं मग बापूंना होय कुसुंबापाणी.
चहा सुपारी नंतर सोमा हुक्का भरोनि आणी.
तंव येवोनी वदति पुजारी–" अमुची असे तयारी.
यजमानांनीं स्नान करावें."–झाले राव पुढारी.
ध्वनियंत्राच्या संगीतांतुनि अभ्यंग आज चाले.
प्रेमलदेवीसंगें सज्जन, स'चतुर' दुर्लभ न्हाले.
मग सर्वांनीं उंची वसनें परिधान आज केलीं.
देवब्राह्मणपदें तयांनीं भावेंच वंदियेलीं.

मग वडिलांना वंदायातें ऋषिवर तयांस नेती.
लाज काढुनी प्रेमलदेवी बापूंपुढेंच येती.
" अपुला सज्जन याची गृहिणी ही आपणांस नमिते. "
' ऑं ! ' करुनी तंव ऋषिमुख बापू साश्चर्य पाहती ते !
सज्जन नमुनी, अंजलि जोडुनि, माफी मागुनि बोले—
" आपण अपुल्या घरींच आहां. " डोळे भरोनि आले.
मग त्याच्यानें पुढें न वदवे; " कथितिल ऋषिवर सारें "
इतकें सांगुनि नमुनि तयांना गेले तेथुनि सारे.
सूरज, सासू, मानसिंग ते साकरबाहि नमोनी,
रावांसह तीं युग्में आलीं मग मंडपामधोनी.
विप्रवरांनीं त्यांच्याकरवीं पुण्याहवाचनादि
आरंभींचीं प्रधान कर्मे संपादिलींच आधीं.
तदितर कर्मे विप्रांकरवीं संकल्पिलीं अशेष.
यजमानांना त्यांहीं नाहीं तसदी दिली विशेष.
मग ते येउनि पाकमंडपीं करितात देखरेख;
आचार्यांना म्हणति "रसोई बनवा कशी सुरेख !"
मालपुवे अन् दूधपाक हें पक्वान्न आज होतें.
त्यांचा घमघम दरवळताहे स्वाद-सुगंध सभोतें !
प्रहरावधिनें पूर्णाहुतिचा तो मंत्रघोष चाले;
हविर्गंधही फैलावुनिया प्रेक्षक चकिताचि झाले.
यजमानांनीं चतुष्पथावरि बलिदानेंही केलीं.
कर्मदक्षिणा आणि भूयसी विप्रांस अर्पियेली.
मग ते ब्राह्मण, किस्मत्पुरचे एकुणएक निवासी,
संतर्पियले देउनि त्यांना मिष्टान्न-भोजनासी.
पानसुपारी, आशीर्वचनें, होउनि विप्र निघाले.
रात्रीं दीपोत्सव, हरिकिर्तन ऋषिवर्यांचें झालें.
त्यांत तयांनीं सज्जन महिमा गावोनि, तत्प्रकाश
यजमानांच्या चरितावरती केला यथावकाश.

" परतुनि आला. कामासाठीं वसाहतींतच राहे.
चिंता न करा. उद्यां दिसेलचि अगदी मजेंत आहे ! "

सांगति ऐसें मानसिंग, तंव चहा–कषायच आला !
तोंड भरोनि दिली सुपारी, हुक्का सतेज झाला !

स्वागत होउनि यापरि उठले मग मानसिंग जाया.
म्हणति–" असावें तयार; येइन अरुणोदगींच घ्याया. "

(ऊ) मेघाच्छादित गगन असोनी पाऊस आज नव्हता,
उषःप्रभेंतुनि भासतसे हा तंद्रेंत लोक भंवता.

कुठुनि तरी ती कुहूकुहू ये सहसाच कोकिलांची;
तंव शकटाची खटखट चाले, घणघणहि घंटिकांची.

ह्या शकटावरि परिचित दिसला दुर्लभच सारथी तो.
पति ' चतुरे' चा वसाहतीला ने रथ निकट पथीं तो.

त्याजमधोनी मानसिंग ते जालनसिंगहि होते;
दुर्लभपत्नी, साकरबाही सूरज असे अहो ते !

रविमंडळही तें मंडळही किस्मत्पुरास आलें.
तेथिल सारा थाट बघोनी गारेगारच झालें ! ३६

## २८ उत्सवाचें वर्णन

सरदारगृहीं मग बापूंना होय कुसुंबापाणी.
चहा सुपारी नंतर सोमा हुक्का भरोनि आणी.

तंव येवोनी वदति पुजारी–" अमुची असे तयारी.
यजमानांनीं स्नान करावें."–झाले राव पुढारी.

ध्वनियंत्राच्या संगीतांतुनि अभ्यंग आज चाले.
प्रेमलदेवीसंगें सज्जन, स'चतुर' दुर्लभ न्हाले.

मग सर्वांनीं उंची वसनें परिधान आज केलीं.
देवब्राह्मणपदें तयांनीं भावेंच वंदियेलीं.

मग वडिलांना वंदायातें ऋषिवर तयांस नेती.
लाज काढुनी प्रेमलदेवी बापूंपुढेंच येती.
" अपुला सज्जन याची गृहिणी ही आपणांस नमिते. "
' आँ ! ' करुनी तंव ऋषिमुख बापू साश्चर्य पाहती ते !
सज्जन नमुनी, अंजलि जोडुनि, माफी मागुनि बोले—
" आपण अपुल्या घरींच आहां. " डोळे भरोनि आले.
मग त्याच्यानें पुढें न वदवे; " कथितिल ऋषिवर सारें "
इतकें सांगुनि नमुनि तयांना गेले तेथुनि सारे.
सूरज, सासू, मानसिंग ते साकरबाहि नमोनी,
रावांसह तीं युग्में आलीं मग मंडपामधोनी.
विप्रवरांनीं त्यांच्याकरवीं पुण्याहवाचनादि
आरंभींचीं प्रधान कर्में संपादिलींच आधीं.
तदितर कर्में विप्रांकरवीं संकल्पिलीं अशेष.
यजमानांना त्यांहीं नाहीं तसदी दिली विशेष.
मग ते येउनि पाकमंडपीं करितात देखरेख;
आचार्यांना म्हणति "रसोई बनवा कशी सुरेख !"
मालपुवे अन् दूधपाक हें पक्वान्न आज होतें.
त्यांचा घमघम दरवळताहे स्वाद-सुगंध समोतें !
प्रहरावधिनें पूर्णाहुतिचा तो मंत्रघोष चाले;
हविर्गंधही फैलावुनिया प्रेक्षक चकिताचि झाले.
यजमानांनीं चतुष्पथावरि बलिदानेंही केलीं.
कर्मदक्षिणा आणि भूयसी विप्रांस अर्पियेली.
मग ते ब्राह्मण, किस्मत्पुरचे एकुणएक निवासी,
संतर्पियले देउनि त्यांना मिष्टान्न-भोजनासी.
पानसुपारी, आशीर्वचनें, होउनि विप्र निघाले.
रात्रीं दीपोत्सव, हरिकिर्तन ऋषिवर्यांचें झालें.
त्यांत तयांनीं सज्जन महिमा गावोनि, तत्प्रकाश
यजमानांच्या चरितावरती केला यथावकाश.

निज जीवात्मा निज यत्नांनीं उद्धरिलाच तयांनीं.
साक्ष तयाची किस्मत्पुर हें देतेंच कौतुकांनीं.
राज्यामधुनी ह्या नमुन्याचें ग्रामोद्धार घडावें.
अधिराजाचे प्रशस्त हेतू तेणें सुफलित व्हावे.
ऐसें कीर्तनसार सांगुनी मग आरतीही केली.
प्रसाद घेउनि सर्व मंडळी प्रसन्न होउनि गेली. २१

## (२९) समारोप

मग सरदारगृहांतुनि झाला जलशाहि दिल्रुब्याचा.
त्यानें मुकुटित जणु तो केला सन्मान पाहुण्यांचा !
जालनबापू सर्दची झाले ! ऋषिवर्यांस म्हणाले—
" माझ्या सज्जन–पुरुषार्थानें मम गतवैभव आलें ! "
ते शाबासी देउनि त्यासी म्हणती–" रहा सुखाचा ! "
सूरज वदली, "हा तेजोदय माझ्या प्रखर मुखाचा !
आतां सूरज मावळुनी ही सरदारबा उदेली !
समज असें तूं माझ्या बेटा ! तूं आज शर्थ केली !
किस्मत्पुरचा राणा ! प्रेमल राणी गोजिरवाणी !
बघुनि तुम्हांला मम हृदयाचें आज जहालें पाणी !
या या माझ्याजवळ मुलांनो ! भेटूं द्याच तुम्हांला."
वीरस्त्री !–रजपूत !–तिला ये मायेचाच उमाळा.
कुरवाळुनि ती उभयांवरुनी रुपये उतरुनि टाकी.
सोमा नाइक हाजर होते ! घेती हंसत तदा की !
" नवें जुनें तें घरही तुमचें मानोनि समसमान,
येथें तेथें रहा सुखानें राखुनि अमुचा मान."
मग ते थंडा फराळ करुनी बंगल्यांत सर्व निजले.
देव दिवाळी मधिल दिवे जणु नाहींच आज विझले.

दुसरे दिवशीं सर्वहि सज्जन–दुर्लभ–गृहांस जाती.
तेथें स्वागत, चहा, सुभोजन घेउनि अमळ रहाती.
सायंकाळीं दुर्लभ गेहीं दे सज्जनास कांहीं.
वदला, " इतकी शिलक असे. तूं आतां घेउनि जा ही."
सज्जन म्हणतो–" राव उद्यां हे जाती परत घरातें.
त्यांस पोंचवूं आपण; म्हणुनी तूं ये मजसह तेथें."
मग ते किस्मत्पुरास आले. होते तिथें तयार.
प्रमिलेकरवीं दुर्लभासिंगां दिधले तीन हजार.
प्रेमलदेवी यांना मग तो दुर्लभमित्र म्हणाला—
" आतां सज्जन ' किस्मत्पुरचा जमीनदार ' जहाला ! "
दुसरे दिवशीं चव्हाण मंडळ पोंचवुनी ते आले.
दीर्घ असें काव्यकथानक येथें समाप्त झालें.
प्रेक्षकजनहो ! किस्मत्पुरचें हें शब्दचित्र आतां
प्रत्यक्षांतुनि जागोजागीं येईल का पहातां !
तें आलें, तर काव्यकला ही झाली कृतार्थ जाणा.
खाशांनाही होइल तेणें रुचिकरसा नजराणा. १७

**उत्तरार्ध समाप्त.**

REFBK-0005496